जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## ओंकार संगीत निकेतनचा १५ ऑक्टोबरला 'स्वरशक्ती' देवीभक्तीवर आधारित कार्यक्रम

भिंगार - देवांग कोष्टी समाज, भिंगार आणि चौंडेश्वरी मंदिर ट्रस्ट यांच्या आयोजनातून, 'ओंकार संगीत निकेतन' प्रस्तुत 'स्वरशक्ती' हा देवीभक्तीवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम १५ ऑक्टोबर रोजी ललिता पंचमीच्या मुहूर्तावर आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम दुपारी ३.३० वाजता चौंडेश्वरी मंदिर, सरपण गल्ली, भिंगार येथे होणार आहे.

नवरात्रोत्सवाच्या पावन पर्वाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात देवीची भक्तिगीते, गोंधळ, भारूड, जोगवा, टिपरी, देवीची स्तोत्रे अशा विविध पारंपरिक कलाप्रकारांची सुरेल आणि भक्तिमय मेजवानी रसिकांना अनुभवता येणार आहे. या गीतप्रकारांवर आधारित शास्त्रीय नृत्य, तसेच पोतराज यांसारख्या पारंपरिक कलांचे सादरीकरण हे कार्यक्रमाचे विशेष आकर्षण असणार आहे. भारतीय संस्कृतीतील लोककला, भक्तिसंगीत आणि शास्त्रीय नृत्य यांचा सुंदर संगम या कार्यक्रमातून अनुभवायला मिळणार आहे. पारंपरिक कलांचे जतन व संवर्धन व्हावे, नव्या पिढीला आपल्या सांस्कृतिक वारशाची ओळख व्हावी आणि देवीभक्तीचा जागर कलात्मक पद्धतीने साजरा व्हावा, हा या उपक्रमामागील उद्देश आहे.

या कार्यक्रमाला मार्गदर्शन आणि संवादिनी साथ सौ. संगीता देऊळगांवकर यांची लाभली असून तबला साथ वैष्णवी कोल्हे, अनुज दरवडे तर जेम्बे साथ पार्थो नाथ करणार आहेत. या कार्यक्रमासाठी नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन अध्यक्ष किशोर भिंगारकर, रमेश वराडे, कार्यकारी मंडळ आणि महिला उत्सव समिती, देवांग कोष्टी समाज, भिंगारतर्फे करण्यात आले आहे.

# वेतनाचा थकित फरक मिळण्यासाठी पेन्शनर्सचा महापालिकेच्या प्रवेशद्वारात 'हलगीचा' कडकडाट

### पाचव्या, सहाव्या आयोगाचे आठ हप्ते दिवाळीपूर्वी देण्याची मागणी; ५०६ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा प्रश्न ऐरणीवर



नगर - दिवाळीचा सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना अहिल्यानगर महानगरपालिकेतील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित आर्थिक प्रश्नांवरून आंदोलन तीव्र होऊ लागले आहे. पाचव्या वेतन आयोगाचा थकीत फरक, सहाव्या वेतन आयोगाचे प्रलंबित आठ हप्ते आणि दरमहा वेळेवर पेन्शन मिळावी, या प्रमुख मागण्यांसाठी कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ संलग्न अहिल्यानगर जिल्हा नगरपालिका व महानगरपालिका पेन्शनर असोसिएशनच्या वतीने महापालिकेच्या प्रवेशद्वारात धरणे आंदोलन सुरू आहे. आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी (१४ ऑक्टोबर) आंदोलकांनी हलगी वाजवून प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. हलगीच्या कडकडाटासह करण्यात आलेल्या निदर्शनांतून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी आवाज उठविला.

संघटनेचे अध्यक्ष एन. एम. पवळे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू असून, न्यायालयीन निर्णयानुसार महापालिकेतील ५०६ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगाचा थकीत फरक मिळणे अपेक्षित आहे. मात्र, संबंधित रक्कम अद्याप मिळालेली नसल्याने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे. या आंदोलनात उपाध्यक्ष वसंत थोरात, मिलिंद वैद्य, कार्याध्यक्ष डी. यू. देशमुख, रंगनाथ गावडे, संजीव परशरामी, मधुकर खताळ, शेखर वैद्य, अन्वर शेख, मुस्ताक शेख, अनिस खान, सतीश वाघ, मंजूर शेख, गुरु टेपाळे, ज्ञानेश्वर धिरडे, दिलीप पाठक, नंदू डापसे, राजेंद्र सस्कर, रवी भारताळ, सुधाकर काशिद, हिरामन जाधव, आर.बी. कदम, गोरक्षनाथ तेलोरे, ठोकळ, अरुण घोडबंदर, प्रमोद मुळे, मुलानी, राजेंद्र बेंद्रे, सौ. रंजना भोसले, लता महाले, मिरा चव्हाण, अंकुश कोतकर, अशोक विधाटे, रफिक शेख, संजय दगडे, मिलिंद नराल, जगदीश घोरपडे, बबन आढाव, राजू मेढे, बाळासाहेब नलगे, सुधाकर काशीद, हुसेन शेख, सादिक शेख, दत्तात्रय फडके यांच्यासह सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले आहेत.

आपल्या सेवाकाळात महापालिकेच्या कामकाजासाठी योगदान दिल्यानंतर निवृत्त जीवनात आर्थिक स्थैर्य मिळणे अपेक्षित असताना, हक्काच्या देय रकमांसाठी आंदोलन करण्याची वेळ आल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. न्यायालयीन निर्णयानुसार देय असलेली रक्कम प्रशासनाने विनाविलंब अदा करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. पाचव्या वेतन आयोगाच्या थकीत फरकासोबतच सहाव्या वेतन आयोगाचे आठही हप्ते अद्याप मिळाले नसल्याचा मुद्दा आंदोलनादरम्यान उपस्थित करण्यात आला. या प्रलंबित हप्त्यांची एकूण रक्कम अंदाजे ६० ते ६५ लाख रुपये असल्याचे संघटनेच्या वतीने सांगण्यात आले.

सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काची आर्थिक देणी मिळण्यासाठी वारंवार मागणी करावी लागत असल्याने आंदोलनकर्त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन प्रलंबित हप्ते दिवाळीपूर्वी अदा करावेत, अशी मागणी करण्यात आली. दिवाळीसारखा महत्त्वाचा सण जवळ आला असताना घरखर्च, किराणा, औषधोपचार आणि इतर जीवनावश्यक खर्चांची व्यवस्था करण्यासाठी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पैशांची गरज आहे. अशा परिस्थितीत थकीत वेतन फरक आणि प्रलंबित हप्ते मिळत नसल्याने त्यांच्या आर्थिक नियोजनावर परिणाम होत असल्याचे आंदोलकांनी नमूद केले. हक्काची रक्कम मिळविण्यासाठी सणासुदीच्या काळात आंदोलन करावे लागत असल्याची खंतही यावेळी व्यक्त करण्यात आली.

महापालिकेतील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना नियमित पेन्शन वेळेवर मिळत नसल्याचा मुद्दाही आंदोलनात उपस्थित करण्यात आला. निवृत्त कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन गरजा आणि औषधोपचारांचा खर्च प्रामुख्याने पेन्शनवर अवलंबून असतो. त्यामुळे पेन्शनच्या रकमेसाठी प्रतीक्षा करावी लागू नये, यासाठी प्रशासनाने निश्चित वेळापत्रकानुसार पेन्शन जमा करण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात आली. दरमहा पेन्शनची रक्कम पाच तारखेपर्यंत संबंधित कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा करावी, अशी संघटनेची प्रमुख मागणी आहे. थकीत वेतन फरक, प्रलंबित हप्ते आणि नियमित पेन्शन या तिन्ही प्रश्नांवर ठोस निर्णय होईपर्यंत सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या अडचणी दूर होणार नाहीत, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली.

या आंदोलनाच्या पहिल्या दिवशी आमदार संग्राम जगताप यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या मागण्या जाणून घेतल्या आणि त्यांना पाठिंबा दिला. तर हा प्रश्न सुटण्यासाठी त्यांनी आयुक्तांना देखील सूचना केल्या. यावेळी माजी महापौर भगवान फुलसौंदर व बाळासाहेब पवार देखील उपस्थित होते.

बुधवारी आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी हलगी वाजवून महापालिका प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. संघटनेच्या वतीने प्रशासनासमोर प्रलंबित मागण्यांचा पुनरुच्चार करण्यात आला. दिवाळीपूर्वी थकीत आर्थिक देणी अदा करून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना दिलासा द्यावा, अशी आग्रही मागणी करण्यात आली. न्यायालयीन निर्णयानुसार ५०६ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगाचा थकीत फरक अदा करणे, सहाव्या वेतन आयोगाचे प्रलंबित आठ हप्ते म्हणजेच अंदाजे ६० ते ६५ लाख रुपये दिवाळीपूर्वी देणे आणि दरमहा पेन्शनची रक्कम पाच तारखेपर्यंत जमा करणे, या मागण्यांवर प्रशासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी संघटनेची भूमिका आहे.



श्री मोहटादेवी मंदिराच्या धार्मिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक योगदानाची दखल घेत विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये नोंद करण्यात आली आहे.

## मोहटे येथील श्री मोहटादेवी मंदिराची विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डस्मध्ये नोंद

पाथर्डी - महाराष्ट्रातील तीर्थक्षेत्रांपैकी एक असलेल्या श्री मोहटादेवी मंदिराच्या धार्मिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक योगदानाची दखल घेत विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये नोंद करण्यात आली आहे. श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्ट, मोहटे यांच्या वतीने धार्मिक परंपरांचे जतन, आध्यात्मिक मूल्यांचा प्रसार आणि भाविकांना धार्मिक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी करण्यात येणाऱ्या उल्लेखनीय कार्याचा या निमित्ताने गौरव करण्यात आला. अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यात मोहटे गावाजवळ, निसर्गरम्य डोंगररांगांमध्ये वसलेले श्री मोहटादेवी मंदिर हे लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. वर्षभर भाविक देवीच्या दर्शनासाठी येथे येतात.

श्री मोहटादेवी मंदिर हे श्रद्धा, भक्ती, आध्यात्मिक शांती आणि धार्मिक परंपरांचे महत्त्वपूर्ण केंद्र आहे. श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्टने धार्मिक विधी आणि उत्सवांचे आयोजन, पवित्र परंपरांचे जतन, तीर्थयात्रेकरूंना सुविधा उपलब्ध करून देणे तसेच आध्यात्मिक मूल्यांचा प्रसार करणे यासाठी केलेल्या समर्पित कार्याची दखल घेऊन धार्मिक वारसा आणि आध्यात्मिक सेवा या श्रेणीअंतर्गत ही नोंद करण्यात आली.

या विक्रमाचे प्रमाणपत्र विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सच्या सचिव सुप्रिया अनिकेत हरके, विहान अनिकेत हरके आणि १८४ विश्वविक्रम करणारे पहिले भारतीय म्हणून गौरविले जाणारे विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सचे अध्यक्ष डॉ. दीपक हरके यांच्या हस्ते श्री मोहटादेवी देवस्थानाचे विश्वस्त बाबासाहेब दहिफळे, शुभम दहिफळे, बाळूशेट लाहोटी, अशोक दहिफळे आणि ॲड. कल्याण बडे यांना प्रदान करण्यात आले.

यावेळी मंदिराचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे, जनसंपर्क अधिकारी भीमराव खाडे, कर्मचारीवर्ग तसेच भाविक उपस्थित होते.



राहुरी-शनि शिंगणापूर रेल्वेमार्गाचे भूसंपादन रद्द करण्याच्या मागणीचे निवेदन केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना देताना खा. निलेश लंके आदी.

## राहुरी-शनि शिंगणापूर रेल्वेमार्गाचे भूसंपादन रद्द करा

### सुपीक बागायती जमिनींच्या अधिग्रहणामुळे शेतकऱ्यांच्या उपजीविकेवर परिणाम होण्याची भीती; खा. नीलेश लंके यांचे निवेदन

नगर - राहुरी-शनि शिंगणापूर नवीन रेल्वेमार्गासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या भूसंपादन प्रक्रियेचा पुनर्विचार करून ती रद्द करावी, अशी मागणी खासदार नीलेश लंके यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. प्रस्तावित रेल्वेमार्गामुळे सुपीक आणि बागायती शेतजमिनी बाधित होण्याची शक्यता असून, त्याचा शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर आणि उपजीविकेवर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो, असे निवेदनात नमूद केले आहे.

भारताच्या राजपत्रात १० डिसेंबर २०२५ रोजी मध्य रेल्वेच्या माध्यमातून प्रसिद्ध झालेल्या अधिसूचनेनुसार, राहुरी तालुक्यातील उंबरे, ब्राम्हणी, देसवंडी आणि कोंढवड येथील जमिनी प्रस्तावित रेल्वेमार्गासाठी अधिग्रहित करण्याची प्रक्रिया विचाराधीन आहे. या परिसरातील बहुतांश शेतकरी शेतीवर अवलंबून असून, संबंधित जमिनी सुपीक, बागायती आणि अधिक उत्पादन देणाऱ्या आहेत. त्यामुळे भूसंपादन झाल्यास शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नावर तसेच त्यांच्या कुटुंबांच्या उदरनिर्वाहावर परिणाम होण्याची शक्यता खासदार लंके यांनी व्यक्त केली आहे.

प्रस्तावित रेल्वेमार्गामुळे शेतजमिनींचे विभाजन होऊन शेतीची कामे करणे, सिंचन व्यवस्था सांभाळणे आणि शेताच्या विविध भागांत पोहोचणे अडचणीचे ठरू शकते. राहुरी परिसरातील सुमारे १५ ते २० किलोमीटरच्या पट्ट्यात सात ते आठ साखर कारखाने असून, या भागातील शेती आणि कृषी अर्थव्यवस्थेला मोठे महत्त्व आहे. अशा परिस्थितीत मोठ्या प्रमाणावर जमिनींचे अधिग्रहण करताना शेतकऱ्यांच्या हिताचा गांभीर्याने विचार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

राहुरी येथे यापूर्वीपासून रेल्वेमार्ग आणि रेल्वेस्थानक अस्तित्वात असताना, नवीन रेल्वेमार्गाची आवश्यकता आणि उपलब्ध पर्यायी मार्गांचा सखोल अभ्यास करण्यात यावा, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. रेल्वे विकासाला विरोध करण्यापेक्षा विकासकामांचे नियोजन करताना शेतकऱ्यांच्या जमिनी, उपजीविकेची साधने आणि भविष्यातील शेतीचे हित सुरक्षित ठेवणे महत्त्वाचे आहे, अशी भूमिका लंके यांनी मांडली आहे.

प्रस्तावित भूसंपादनाचा पुनर्विचार करून बाधित शेतकऱ्यांना न्याय द्यावा आणि त्यांच्या हिताला बाधा पोहोचणार नाही, यासाठी आवश्यक निर्णय घ्यावेत, असे आवाहन खासदार नीलेश लंके यांनी केंद्रीय रेल्वेमंत्र्यांना केले आहे.

## मतदारांच्या हक्कांसाठी साखळी उपोषण सुरूच

### ज्ञानेशकुमार यांच्या राजीनाम्याची मागणी; मार्केटयार्ड चौकात रात्रीही पोवाडे, देशभक्तीपर गीतांतून एसआयआरविरोधात एल्गार



विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण प्रक्रिया (एसआयआर) रद्द करण्याच्या मागणीसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) पक्षाच्या वतीने अहिल्यानगर शहरात साखळी उपोषण सुरू आहे.

नगर - मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या राजीनाम्यासह त्यांच्यावर कठोर कारवाई करावी आणि मतदारांच्या हक्कांवर परिणाम होण्याची शक्यता असल्याचा आरोप करत विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण प्रक्रिया (एसआयआर) रद्द करण्याच्या मागणीसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) पक्षाच्या वतीने अहिल्यानगर शहरात साखळी उपोषण सुरू आहे. मार्केटयार्ड चौकातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर सुरू असलेल्या या आंदोलनाचा १३ ऑक्टोबर रोजी पाचवा दिवस होता. पुतळ्यासमोर सुरू असलेल्या साखळी उपोषणात सहभागी आंदोलकांनी आपल्या मागण्यांसाठी घोषणाबाजी केली. दिवसभर सुरू असलेले आंदोलन रात्रीदेखील सुरू असून, घोषणांच्या आवाजाने परिसर दणाणून जात आहे. पोवाडे, देशभक्तीपर गीते आणि स्फूर्तिगीतांच्या माध्यमातून आंदोलक नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहेत.

मतदार यादीतील कथित त्रुटी आणि पात्र मतदारांची नावे वगळली जाण्याच्या मुद्द्यावरून सुरू असलेल्या या आंदोलनाला पाच दिवस पूर्ण झाले आहेत. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांनी राजीनामा द्यावा, तसेच या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी भूमिका पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मांडली आहे.

या उपोषणात शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के, गुलाम शेख, विजय शिरसाठ, अजीम खान, नईम शेख, विल्सन रुकडीकर, स्वप्नील साठे, राहुल ठोकळ, अझीझ शेख, शुभम दारकुंडे, जालिंदर कानडे, लकी वाघमारे, अरबाज शेख, जमीर सय्यद, जावेद शेख, आयन शेख, नजीर देशमुख, पीटर लोंढे, फयाज शेख, तौसिफ शेख, जावेद सय्यद, फारूक शेख, प्रशांत आठवले, योहान चाबुकस्वार आणि चिकू गायकवाड यांच्यासह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले आहेत. महिला आघाडीच्या ज्योती पवार, संपदा म्हस्के, मनीषा गायकवाड, विश्रांती पठारे, प्रियंका पठारे, शीतल नाटिकर, रेश्मा जाधव आणि प्रमिला शिरसाठ यांच्यासह महिला कार्यकर्त्यांनीही आंदोलनात सहभाग घेतला आहे.

याशिवाय समविचारी पक्ष आणि विविध संघटनांचे प्रतिनिधी आंदोलनस्थळी उपस्थित राहून पाठिंबा देत आहेत.

## सौ. शारदा देशमुख यांचे अल्प आजाराने निधन



नगर - बुऱ्हाणनगर येथील शिवकृपा, बाणेश्वर कॉलनी येथील रहिवासी सौ. शारदा देशमुख (वय ५८) यांचे १३ ऑक्टोबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यामागे सुना, पुतण्या, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर बुऱ्हाणनगर येथील अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

सौ. शारदा देशमुख या भाजपाचे जिल्हा समन्वयक विनायक देशमुख यांच्या भावजयी तर सार्वजनिक बांधकाम विभागातील सेवानिवृत्त रविंद्र देशमुख यांच्या पत्नी तर मुकुल व हर्षवर्धन तसेच मेघा यांच्या आई होत.

# अनधिकृत बांधकामांच्या दस्त नोंदणीवर बंदी

### आता अर्जासोबतच्या कागदपत्रांची ७ मुद्यांवर होणार क्रॉस चेकिंग

मुंबई - राज्यातील दस्त नोंदणी प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि सुरक्षित करण्यासाठी महसूल विभागाने आता 'एक जिल्हा, एक नोंदणी' सुविधा लागू केली आहे. दस्त नोंदणीतील गैरप्रकार रोखण्यासाठी आणि पारदर्शकता वाढवण्यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय जाहीर केला आहे. अर्जासोबत जोडण्यात येणाऱ्या कागदपत्रांची आता तब्बल सात महत्त्वाच्या मुद्द्यांवर क्रॉस चेकिंग केली जाणार आहे. दस्त नोंदणीचा नेमका हेतू काय आहे आणि नोंदणीसाठी दुसरा तालुका निवडला असल्यास त्याचे नेमके कारण काय, याची सखोल पडताळणी केली जाईल. आता ही दस्त नोंदणी केवळ सह दुय्यम निबंधक आणि सह जिल्हा निबंधकांद्वारेच केली जाणार आहे. दस्तनोंदणी प्रक्रियेतील त्रुटी आणि गैरप्रकार रोखण्याच्या दृष्टीने या बदलांमुळे महसूल विभागाच्या कारभारात अधिक पारदर्शकता येईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

कष्टाच्या पैशातून घर खरेदी करणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांची फसवणूक रोखण्यासाठी राज्य शासनाने अनधिकृत बांधकामांच्या दस्तनोंदणीवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यात आता युडीसीपीआर, डीपी प्लॅन व रिजनल प्लॅनच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या अनाधिकृत इमारती आणि फ्लॅट्सची नोंदणी होणार नाही. रेरा आणि सक्षम प्राधिकरणाची मंजुरी आवश्यक असेल, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, यानंतर राज्यामध्ये नोंदणी होत असताना मोजणी शिवाय नोंदणी होणार नाही. सोबतच या ठिकाणी कुठलाही अनाधिकृत फ्लॅट, अनाधिकृत इमारत, ती जर परवानगी प्राप्त नसेल, UDCPR प्रमाणे किंवा नियमावली पालन केली नसेल, DP Plan प्रमाणे नियमावली पालन केली नसेल, Regional Plan च्या तरतुदी पाळल्या नसतील आणि ती मंजुरी नसेल, तर आता इमारतीचं कुठलही रजिस्ट्रेशन होणार नाही, कुठलेही फ्लॅट विकता येणार नाही, त्यांना रेगुलराईज करून विकावं लागेल म्हणजे एखादी इमारत अनाधिकृत असेल, तर रेगुलराईज करून घ्यावी लागेल आणि जी इमारत कधीच रेगुलराईज करता येत नाही, ती इमारत कधीच त्या ठिकाणी कायदेशीर होऊ शकत नाही. त्या इमारतीला उद्या तोडून टाकावं लागेल. पण जी इमारत कायदेशीर होऊ शकते १९-२० आहे, काही त्रुटी आहे, तर त्रुटी दूर करेल. सरकारकडे जर असे लोक आले की बाबा जे गरीब माणसाचे हित त्या ठिकाणी आहे, फ्लॅट विकून टाकले आणि बिल्डर पळून गेले, फ्लॅट विकून टाकले, बिल्डर पळून गेले, अशा इमारतीवर काहीतरी या ठिकाणी आपल्याला विचार करावा लागेल. पण यानंतर मात्र अनाधिकृत इमारती बांधता येणार नाही, अनाधिकृत बिल्डिंग त्या ठिकाणी फ्लॅट करता येणार नाही. RERA चे रजिस्ट्रेशन करून RERA च्या कायद्यानुसार परवानगी घेऊन आणि जे जे Development Authority आहे, त्या Development Authority च्या परवानगी घेऊनच आता बांधकाम करावे लागतील, कोणतेही बांधकाम अनाधिकृत चालणार नाही, अनाधिकृत बांधकामाची रजिस्ट्रेशन होणार नाही.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### हृदय ठेवा निरोगी...

तीस वर्ष हे वय असते जिथे शरीराची वाढ थांबून हळूहळू झीज सुरू होते आणि याच वयात आपल्या खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयी आणि बैठे काम याचा परिणाम हृदयावर दिसू लागतो म्हणून या वयापासून दरवर्षी तपासण्या करणे ही काळाची गरज बनली आहे. सर्वप्रथम रक्तदाबाची तपासणी येते कारण उच्च रक्तदाब हा हृदयविकाराचा सर्वात मोठा शत्रू आहे आणि तो सुरुवातीला कोणतेही लक्षण दाखवत नाही त्यामुळे दर तीन महिन्यांनी रक्तदाब मोजणे गरजेचे आहे त्यानंतर रक्तातील साखरेची तपासणी येते कारण साखर वाढली की रक्तवाहिन्या कडक होतात आणि हृदयाला रक्त पुरवठा करणाऱ्या नळ्यांमध्ये अडथळा येतो. त्याचबरोबर रक्तातील चरबीची तपासणी ज्यामध्ये एकूण चरबी वाईट चरबी चांगली चरबी आणि इतर स्निग्ध पदार्थ यांचे प्रमाण पाहिले जाते हे प्रमाण बिघडले तर हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता अनेक पटीने वाढते. यानंतर हृदयाच्या ठोक्यांची विद्युत रेषा तपासणी येते जी अतिशय सोपी आणि कमी खर्चाची आहे. या तपासणीत हृदयाची लय ठोके नियमित आहेत का हृदयाच्या स्नायूंना पुरेसा रक्तपुरवठा होतो आहे का हे कळते जर कुटुंबात हृदयविकाराचा इतिहास असेल किंवा छातीत दुखणे धाप लागणे चक्कर येणे अशी लक्षणे असतील तर डॉक्टर हृदयाची प्रतिध्वनी तपासणी करण्याचा सल्ला देतात ज्यात हृदयाच्या चारही कप्प्यांची ताकद झडपांची हालचाल आणि रक्त ढकलण्याची क्षमता स्पष्ट दिसते. या बरोबरच धावत्या पायवाटेवर चालवून घेतली जाणारी दमछाक तपासणी खूप महत्वाची आहे. कारण विश्रांतीच्या वेळी सामान्य दिसणारे हृदय धावताना कसे काम करते हे त्यात कळते याशिवाय रक्त घट्ट होण्याचे प्रमाण मुत्रपिंडाचे कार्य आणि थायरॉईड ग्रंथीची तपासणी देखील करावी कारण या सर्व अवयवांचा थेट संबंध हृदयाशी असतो. केवळ तपासण्या करून उपयोग नाही तर रोज सकाळी चालणे हलका व्यायाम करणे जेवणात मीठ तेल आणि मैद्याचे पदार्थ कमी करणे पालेभाज्या आणि फळे जास्त खाणे पुरेशी झोप घेणे आणि चिंता कमी करणे या गोष्टी पाळल्या तर हृदय दीर्घकाळ निरोगी राहते.

## पाककला

### गुलाब मलाई सँडविच

**साहित्य :** ब्रेड स्लाईस ८, ताजे पनीर १०० ग्रॅम, फ्रेश मलाई ४ चमचे, गुलकंद २ चमचे, सुकलेल्या गुलाब पाकळ्या १ चमचा, पिठीसाखर २ चमचे, वेलची पावडर १/४ चमचा, बारीक चिरलेला पिस्ता १ चमचा, बारीक चिरलेला बदाम १ चमचा, गुलाब इसेन्स २ थेंब, बटर २ चमचे

**कृती :** ताजे पनीर किसून घ्या. त्यात फ्रेश मलाई, पिठीसाखर, गुलकंद, वेलची पावडर आणि गुलाब इसेन्स घालून मिश्रण एकजीव करा. ब्रेडच्या चारही स्लाईसच्या एका बाजूला बटर लावा. चार स्लाईसवर तयार गुलाब मलाईचे मिश्रण जाडसर थर देऊन पसरा. त्यावर सुकलेल्या गुलाब पाकळ्या, पिस्ता आणि बदामाचे काप पसरा. उरलेल्या चार ब्रेड स्लाईस बटर लावलेल्या बाजूने आतल्या बाजूला ठेवून हलक्या हाताने दाबा. तवा गरम करून त्यावर थोडे बटर सोडा. सँडविच ठेवा आणि वरूनही बटर लावा. मध्यम आचेवर दोन्ही बाजूने हलकासा सोनेरी रंग येईपर्यंत ग्रील करा. तयार सँडविचचे त्रिकोणी तुकडे करून गुलाब पाकळ्यांबरोबर थंड सर्व्ह करा.

## वास्तू

### लहान फ्लॅटसंबंधी...

* लहान फ्लॅटमध्ये बेड भिंतीला चिकटवून लावला जातो. बेड नैऋत्य कोपऱ्यात ठेवण्याचा प्रयत्न करा. झोपताना डोके दक्षिणेला ठेवा. डोके उत्तरेला असेल तर पैशाची अडचण आणि झोप न लागणे असे त्रास होतात.

* अनेकजण ईशान्य कोपऱ्यात कपाट, डस्टबिन किंवा जड सामान ठेवतात. हा कोपरा नेहमी हलका, स्वच्छ आणि मोकळा ठेवा.

## सौंदर्य

* साखर आणि तेल स्क्रब एकत्रितपणे लावल्यास मृत त्वचा निघते.

* ऑलिव्ह ऑईल नखांना लावल्यास नखे तुटत नाहीत.

* ग्लिसरीन + लिंबू हातांना लावल्यास हात मऊ, गोरे होतात.

## सल्ला

भाजीला मीठ जास्त झाले तर त्यात बटाटा किंवा कणकेचा गोळा टाका.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर २०२६

**ललिता पंचमी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आश्विन शुक्लपक्ष, ज्येष्ठा अहोरात्र, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०६ वा. ३१ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** राहत्या जागेचे प्रश्न मार्गी लागतील. मानसिक प्रसन्नता लाभेल.

**वृषभ :** कर्तृत्वाला संधी मिळेल. अध्यात्मात रस वाढेल.

**मिथुन :** जुनी येणी वसूल होतील. आर्थिक व्यवहार सुरळीत होतील.

**कर्क :** दैनंदिन कामे पूर्ण होतील. आरोग्याच्या तक्रारी कमी होतील.

**सिंह :** महत्वाची कामे रखडतील. मन अस्वस्थ राहील.

**कन्या :** सर्वांचे सहकार्य लाभेल. महत्वाचे निर्णय होतील.

**तूळ :** आत्मविश्वास वाढेल. व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव दिसेल.

**वृश्चिक :** हाती घेतलेल्या कामात यश मिळेल. मानसिक समाधान लाभेल.

**धनू :** खर्च वाढेल. दिवस धावपळीत जाईल.

**मकर :** वैवाहिक जीवनात सुसंवाद राहील.

**कुंभ :** खर्च वाढण्याची शक्यता आहे. वस्तू गहाळ होण्याची शक्यता आहे.

**मीन :** व्यवसायातील अंदाज बरोबर येतील. प्रवासाचे योग आहेत.

## शब्दगंध क्र. ७५३७ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७५३६ चे उत्तर



**आडवे शब्द :-** २) ज्याला ऐकू येत नाही असा ५) कातरवेळ; संध्याकाळ ७) पूर्वेकडील एक प्रगत देश ९) प्राणी; पशू; सर्प ११) गोष्ट; कलम १२) एक प्रकारचे हलके रेशमी वस्त्र १३) चलाख; हुशार; ताजातवाना १५) मामाची बायको १६) दाणे ज्यात भरतात तो पिकाचा भाग; भुट्टा १८) प्रबळ इच्छा; लोभ १९) अभियान २०) भाजीपाला (हिंदी, उर्दू) २१) राखण करणारा; रखवालदार

**उभे शब्द :-** १) अडका; पैका २) जबरदस्ती; जुलूम ३) कारकीर्द ४) एखाद्या संख्येच्या वर्गाला त्याच संख्येने गुणून येणारी संख्या ६) यावर्षी ८) जुन्या काळातील एक हिंदी चित्रपट; परीस १०) चावण्याचा अवयव; दात वार्ता ११) वृत्त; समाचार; वार्ता १४) विष्णुपत्नी; लक्ष्मी १६) कटी; कंबर; नितंब १७) पक्का बांधलेला रस्ता १८) हस्त; कर १९) घरातील सांडपाणी काढून देण्याची वाट

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : आई वडिलांच्या पायाशी वाकाल तर आयुष्यात कधीच पडणार नाही.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### एका दिवसासाठी गुरुत्वाकर्षण नाहीसे झाले तर काय होईल?

कल्पना करा सकाळचे सहा वाजले आहेत तुम्ही झोपेतून जागे होता आणि तुम्हाला जाणवते की तुमची चादर अंगावर नाहीये ती हवेत तरंगते आहे तुम्ही उठण्याचा प्रयत्न करता पण तुमचे पाय जमिनीला लागत नाहीत तुम्ही हवेत उलटे पालटे होऊ लागता घरात सगळ्या वस्तू हवेत तरंगत आहेत जणू काही पाण्याखाली सगळे तरंगावे तसे दृश्य दिसते कारण आज गुरुत्वाकर्षण नावाची शक्तीच नाहीशी झाली आहे जी शक्ती आपल्याला खाली खेचते तीच गायब झाली आहे. सुरुवातीचे काही मिनिटे गंमत वाटेल मुले आनंदाने ओरडतील आम्ही पक्षासारखे उडतोय पण थोड्याच वेळात ही गंमत भीतीत बदलेल तुम्हाला तहान लागेल तुम्ही पाणी पिण्यासाठी तांब्या उचलाल पण तांब्यातील पाणी तांब्यात राहणारच नाही ते हवेत एका चमकदार गोळ्यासारखे तरंगेल तुम्ही तोंडाने त्या गोळ्याला पकडण्याचा प्रयत्न कराल तर तो गोळा फुटून लहान लहान थेंब होतील आणि ते थेंब घरभर पसरतील जेवण करणे तर अशक्यच होईल.

भाकरी भाजी ताटात राहणार नाही ती हवेत जाईल चूल पेटवली तर धूर खाली येणार नाही तो वर जाणार नाही तो सगळीकडे पसरेल कारण धुराला वर नेणारे गरम हवेचे प्रवाह गुरुत्वाकर्षणाशिवाय तयारच होणार नाहीत. घराबाहेर पडाल तर जग अधिकच उलटे पालटे दिसेल रस्त्यावरची धूळ माती दगड सगळे हवेत गेलेले असतील झाडे मुळासकट उपटून हवेत तरंगत असतील कारण मुळे ज्या मातीत आहेत ती मातीच आता जमिनीला चिकटून नाहीये गाड्या रस्त्यावरून वर उचलल्या जातील घरे ज्यांचे पाय खोल रोवले आहेत ती थोडी वेळ टिकतील पण त्यांच्यावर असलेले पत्रे कौले वर उडून जातील.

समुद्राची स्थिती तर कल्पनेच्या बाहेरची असेल. समुद्राचे अफाट पाणी आता खाली राहणार नाही ते वर आकाशाकडे जाईल समुद्र वर जाईल आणि खालचे जमिनीचे काळे कडे दिसू लागतील. मासे पाण्याबरोबर हवेत तरंगतील नद्यांचे पाणी वाहणार नाही ते जागेवरच थांबून मग वर जाईल. माणसाच्या शरीरावरही विचित्र परिणाम होतील आपल्या शरीरातील रक्त गुरुत्वाकर्षणामुळे खाली पायाकडे ओढले जाते हृदय त्याला वर ढकलते पण जेव्हा गुरुत्वाकर्षणच नसेल तेव्हा रक्त सगळे डोक्यात आणि छातीत साचेल डोके जड होईल. डोळे सुजतील पाय बारीक होतील आपल्या कानाच्या आत जी तोल सांभाळणारी यंत्रणा आहे ती बिघडेल त्यामुळे सतत गरगरल्यासारखे वाटेल उलटी आल्यासारखे वाटेल काहींना काही तासातच चक्कर येऊन बेशुद्ध वाटू लागेल आणि सर्वात मोठा धोका म्हणजे हवा निघून जाणे. आपण जी हवा श्वासासाठी घेतो ती पृथ्वीला गुरुत्वाकर्षणानेच धरून ठेवली आहे.

जर गुरुत्वाकर्षण गेले तर हवा हळूहळू अवकाशात पसरू लागेल सुरुवातीला वारा जोरात वाहत असल्यासारखा वाटेल पण तो वारा वरच्या दिशेने असेल काही तासात हवा विरळ होईल श्वास घेणे कठीण होईल आकाशाचा रंग निळा दिसणार नाही कारण निळा रंग हवेतील कणांमुळे दिसतो हवा गेली की आकाश काळे दिसेल दिवसा सुद्धा तारे दिसू लागतील सूर्य अधिक झळकत असल्यासारखा वाटेल पण उष्णता अंगाला भाजू लागेलपृथ्वी स्वतः सुद्धा फुटू लागेल पृथ्वी आतून गरम आहे आणि वरून थंड आहे तिला एकत्र धरून ठेवणारे तिचे स्वतःचेच गुरुत्वाकर्षण आहे ते गेले तर जमिनीला भेगा पडतील डोंगर फुटतील ज्वालामुखी सगळीकडून फुटतील कारण आतला गरम रस बाहेर येण्यासाठी त्याला अडवणारे काहीच नसेल एका दिवसाच्या शेवटी पृथ्वी हा एक सुंदर निळा गोळा राहणार नाही तर दगड धूळ आणि पाण्याचे तुकडे अवकाशात विखुरलेले असतील म्हणून आपण रोज चालतो पळतो उड्या मारतो आणि जमिनीवर परत येतो ही अगदी साधी गोष्ट वाटते पण तीच गोष्ट आपल्याला जिवंत ठेवते.

गुरुत्वाकर्षण दिसत नाही त्याचा आवाज येत नाही पण ते नसेल तर एका दिवसात जीवन संपते हे या कल्पनेतून लक्षात येते.

### मैदानी खेळ

एका मोठ्या जंगलात सगळ्या प्राण्यांनी ठरवले, चला आपण मैदानी खेळाचा दिवस करू. ससा, कासव, हत्ती, माकड, हरीण सगळे मैदानात जमले.

ससा सगळ्यात पुढे येऊन म्हणाला, मी तर पळण्यात सगळ्यात वेगवान आहे. माझ्यापुढे कोणीच टिकणार नाही. मी एकटाच सगळे खेळ जिंकेन. पहिला खेळ होता पळण्याची शर्यत. ससा जोरात पळाला. पण मैदानात एक मोठा खड्डा होता. ससा वेगात असल्यामुळे त्याला खड्डा दिसला नाही आणि तो धाडकन खड्ड्यात पडला. मागून येणारे हरीण आणि कासव हळू हळू येत होते. त्यांनी वाट पाहिली, एकमेकांना आधार दिला. हत्तीने सोंडेने सशाला खड्ड्यातून बाहेर काढले.

दुसरा खेळ होता दोरी ओढणे. एका बाजूला हत्ती एकटा होता, दुसऱ्या बाजूला सगळे छोटे प्राणी माकड, ससा, हरीण, कासव एकत्र आले. सगळ्यांनी एकत्र जोर लावला आणि बलाढ्य हत्तीलाही ओढून हरवले .तेव्हा जंगलाचा म्हातारा अस्वल म्हणाला, बघितलंत का? मैदानी खेळात एकट्याच्या वेगापेक्षा आणि ताकदीपेक्षा एकजुटीला जास्त किंमत आहे. जो अहंकार करतो तो खड्ड्यात पडतो, आणि जे एकत्र खेळतात तेच खरे जिंकतात. तेव्हापासून जंगलातले प्राणी रोज संध्याकाळी एकत्र मैदानावर खेळू लागले. बोध – मैदानी खेळ आपल्याला शिकवतात की जिंकणे महत्त्वाचे नाही, तर एकत्र खेळणे, एकमेकांना सांभाळणे आणि नम्र राहणे हेच खरे शिक्षण आहे.

## आत्मशक्ति



### अध्यात्मिक शक्ती

कोणा महात्म्याने म्हटले आहे की, ''जेथे मी (अहं) असतो तेथे परमेश्वर नसतो. आणि जेथे परमेश्वर असतो तेथे मी (अहंभाव) नसतो.''शीख धर्मग्रंथात आले आहे की, हउमै करी तां तू नाही तू होवहि हउ नाहि। बूझहु गिआनी बूझणा एहे अकथ कथा मन माहि।। (गुरु ग्रंथसाहेब मारू की वार महला १, पृ. १०९२) जर परमात्मा व आत्मा एकच आहेत तर ''तुझे'' आणि ''माझे'' असा प्रश्नच उभा राहत नाही. दोघेही ''तुम्ही'' असतात. सूफी परंपरेत एक सुंदर कथा आहे. त्यामध्ये एका माणसाने परमेश्वराच्या घराच्या दारावर थाप दिली. परमेश्वराने 'कोण आहे?' असे विचारले. त्या माणसाने उत्तर दिले, ''मी आहे.'' त्याच्यासाठी, दरवाजा उघडला गेला नाही. परमेश्वराने आपल्याला आत का घेतले नाही ह्याबाबत त्याने बराच वेळपर्यंत विचार केला. त्याचे उत्तर मिळण्यासाठी त्याने परमेश्वराची प्रार्थना केली. शेवटी त्याला एक कल्पना सुचली तो परमेश्वराकडे परत गेला. परमेश्वराने पुन्हा विचारले, कोण आहे? ह्यावेळी त्या माणसाने उत्तर दिले, आपणच आहात! दरवाजा उघडला आणि तो मनुष्य परमेश्वराशी एकरूप झाला. जेव्हा आमचा अभिमान दूर होतो तेव्हा मी पणा संपतो व आम्ही परमेश्वराशी एकरुप होतो. मग आत्मा व परमात्म्यात काहीच फरक रहात नाही. संत कृपालसिंहजी महाराज नेहमी म्हणायचे की, प्रभु+मन = मानव, मानव–मन = प्रभु. अहंकारच आम्हाला भ्रमात टाकतो की आपण परमेश्वराहून वेगळे आहोत. अहंकारामुळेच आम्ही आत्म्याला जागृत करु शकत नाही. आत्म्यावरील ही आवरणे आमच्या वास्तविक रुपाला कशी भुलवतात ?

काम, क्रोध, वासना, लोभ, मोह, धोकेबाजी आणि अहंकार ह्याची आवरणे आत्म्याच्या वास्तविक रुपाला भुलवतात. आम्ही प्रेम, सत्य, शांति, आनंद, नम्रता, पावित्र्य, अहिंसा आणि निस्वार्थी आहोत, हेच नेमके विसरुन गेलो. मुस्लीम धर्मग्रंथात सांगितले आहे की,

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### नाती घट्ट विणू या

जेव्हा घरी पाहुणे येतात तेव्हा घरातले आपल्या मुलांना त्या पाहुण्यांसमोर नाच सादर करणं, कविता म्हणणं असं काहीतरी करायला सांगतात किंवा शाळेत मिळालेले एखादं बक्षीस दाखवायला सांगतात. कामगिरी झाली की सगळे मुलाचं कौतुक करतात. एखाद्याचं कौतुक करणं चांगलं आहे, पण कौतुक कशाचं होत असतं तर मुलाच्या कामगिरीचं. आपल्याला मुलाला सांगायचं असतं की, तू खूप छान नाच केलास. पण बोलताना आपण म्हणतो व्हेरी गुड बॉय. लहान मुलगा ही माहिती स्वतःमध्ये अशी उतरवतो – जेव्हा मी चांगलं परफॉर्म करतो, तेव्हा माझं कौतुक होतं आणि सगळ्यांना वाटतं की मी खूप शहाणा मुलगा आहे. हीच त्याची विश्वासप्रणाली बनते. तू खूप छान कलाकार आहेस, असं आपण म्हणालो असतो तर गोष्ट वेगळी होती.त्याचप्रमाणे, मोठ्यांना न आवडणारी एखादी गोष्ट मुलाने केली की, त्या कृतीबद्दल असहमती दाखवण्याऐवजी मोठे त्याला, तू बॅड बॉय/गर्ल आहेस, असं म्हणतात. सुरेश ओबेरॉय : जेव्हा कोणी खूप चविष्ट पदार्थ बनवतं, तेव्हा त्या पदार्थाची स्तुती करण्याऐवजी कुटुंबातील सदस्य किती चांगली/चांगला आहेस तू, असं म्हणतात. पदार्थ चविष्ट झाला आहे, असं ते म्हणत नाहीत.शिवानीदीदी : हो. ह्या गोष्टी दिसायला खूप छोट्या असतात पण त्यांमध्ये खूप महत्त्वाचे संदेश असतात. ज्याची प्रशंसा होते त्या माणसासाठी ती प्रशंसा मानसिक प्रोग्रामिंग करते. जेव्हा आपण चांगलं परफॉर्म करू आणि सगळे आपली प्रशंसा करतील तेव्हा ङ्कमी चांगला माणूस होईन,ङ्ख असा त्याचा समज होतो.सुरेश ओबेरॉय : आणि जेव्हा तो चांगलं परफॉर्म करत नाही तेव्हा तो स्वतःला चांगला समजत नाही.

शिवानीदीदी : हो. कारण लोक कधीच वाईट कामगिरी असं म्हणत नाहीत तर त्याऐवजी ते वाईट माणूस, असं संबोधतात. एखाद्याची कामगिरी वाईट होणं ही अडचण नाहीये कारण चढउतार सगळीकडेच असतात. त्या व्यक्तीचा स्वाभिमान तिच्या कामगिरीला चिकटवणं किंवा तिच्या चांगुलपणाचं मोजमाप तिच्या कामगिरीवरून करणं ही खरी अडचण आहे.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**बायको :** अहो ऐकलं का? आई म्हणतेय आपल्या घरीच राहणार.

**जावई :** मग मी पण माझ्या आईला इथेच बोलावतो.

**बायको :** नको नको, आई म्हणतेय ती आता जाणार!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* जगात सर्वात जास्त अणुऊर्जा तयार करणारा देश कोणता?

– अमेरिका

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### आयुर्वेदिक गर्भसंस्कार

त्या वेळी ती म्हणाली, डॉक्टर, रक्ताच्या तपासण्या करून घेतल्या आहेत; परंतु पंचकर्म वगैरे कधी आम्ही केले नाही.रोहिणीचा तर प्रॉब्लेम वेगळाच होता. लग्नाला पाच वर्ष होऊनही गर्भधारणा होत नव्हती. सर्व काही ॲलोपॅथी उपचार करूनही तिला फरक पडला नव्हता, त्या वेळी ती गर्भसंस्कार शिबीर ऐकण्यासाठी खास पुण्याहून नगरला आली होती.संगीताचे पहिले बाळ मतिमंद जन्माला आले होते. तिला आपले दुसरेही बाळ असेच होईल असे सारखे वाटत असे. त्यावेळी मी तिला सांगितले, 'गर्भ राहण्याआधीच आपण काही तपासण्या व उपचार करून घेऊ या. म्हणजे नक्कीच तुझे दुसरे बाळ सुदृढ, हुशार व बुद्धिमान होईल'.

उषाचा गर्भावस्थेत कायम रक्तदाब वाढत असे. तिचे बाळ रक्तदाब वाढण्यामुळे पोटातच दगावले होते; त्यामुळे ती आता मला 'बाळच नको' असे म्हणत होती. माझा कायमच रक्तदाब वाढतो व पुढच्या वेळेस देखील रक्तदाब वाढेल. त्या वेळी मी तिला सांगितले, 'गर्भ राहण्याआधीच आपण तुझे उपचार सुरू करू या. त्यामध्ये पंचकर्मातून शरीरशुद्धी, ध्यानधारणा, प्राणायाम, योग्य असा सात्त्विक आहार याचे नियोजन करू या म्हणजे आपोआपच तुझा रक्तदाब नॉर्मल राहील. गर्भ नियोजनपूर्वक राहायला हवा, अचानकच गर्भधारणा झाली, तर बऱ्याच जणींना वरीलपैकी कुठल्यातरी एका समस्येला सामोरे जावे लागते.

काही स्त्रियांना गर्भधारणा झाल्यानंतर २–३ महिन्यांमध्ये गर्भपात होतो व असा गर्भपात वारंवार होत राहतो. काही स्त्रियांमध्ये हायड्रोकेफ्लस (बाळाचे डोके मोठे असणे) किंवा जन्मतःच विकृती असलेले बाळ जन्मास येणे, बाळ मतिमंद जन्मास येणे किंवा पाच ते सहा महिने होऊन अबॉर्शन होणे असे दुःखद अनुभव येतात;

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ–महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं– ८७९३४००४००



बी.पी.एच.ई. सोसायटीचे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (आय.एम.एस.सी.डी.आर.), अहिल्यानगर येथील लर्निंग रिसोर्स सेंटरतर्फे भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त 'वाचन प्रेरणा दिन' आणि 'लेखक-वाचक सुसंवाद' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजमध्ये 'वाचन प्रेरणा दिन' व 'लेखक-वाचक सुसंवाद' उत्साहात

नगर – बी.पी.एच.ई. सोसायटीचे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (आय.एम.एस.सी.डी.आर.), अहिल्यानगर येथील लर्निंग रिसोर्स सेंटरतर्फे भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त 'वाचन प्रेरणा दिन' आणि 'लेखक-वाचक सुसंवाद' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, ज्ञानाची जिज्ञासा वाढवणे आणि वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. संस्थेला एन.ए.ए.सी., बेंगळुरू यांच्याकडून पुनर्मान्यता प्राप्त झाली असून, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा 'सर्वोत्कृष्ट संस्था' पुरस्कारही मिळाला आहे. गेल्या तीन दशकांहून अधिक काळापासून व्यवस्थापन शिक्षणाच्या क्षेत्रात कार्यरत आहे. संस्थेच्या लर्निंग रिसोर्स सेंटरला डिस्कव्हरी मीडिया प्रायव्हेट लिमिटेड, नवी दिल्ली यांच्याकडून 'बी-स्कूल लायब्ररी पुरस्कार' प्राप्त झाला आहे.

कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम आणि संस्थेचे संस्थापक डॉ. बी. पी. हिवाळे यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेच्या प्रभारी संचालिका डॉ. प्रणोती तेलोरे उपस्थित होत्या. त्यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविक व स्वागतपर मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास उपसंचालक डॉ. विक्रम बार्नाबस, गिरीश टोकसिया, ग्रंथपाल डॉ. स्वाती बार्नाबस, तसेच स्टुडंट लायब्ररी कमिटीचे सदस्य आणि प्रा. गौरी पाटील, प्रा. श्रुती राव व प्रा. सायली तोरणे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते सुमेध गुप्ते हे होते.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी स्टुडंट लायब्ररी कमिटीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेत नियोजन, व्यवस्थापन आणि अंमलबजावणीत मोलाचे योगदान दिले. कार्यक्रमाची सुरुवात करून गौरी बनसोडे यांनी सूत्रसंचालनाची जबाबदारी पार पाडली. तर पाहुण्यांचा सत्कार व आदरातिथ्य यासंबंधी निवेदन साई चासकर यांनी केले. रिफ्रेशमेंट कूपन वाटप आणि आभार प्रदर्शनाची जबाबदारी वैभवी कदम यांनी पार पाडली.

कार्यक्रमाच्या प्रसिद्धीसाठी रील्स व शॉर्ट व्हिडिओ तयार करण्याचे काम वैभवी कदम, श्रुती सागर, मुस्कान सय्यद आणि मसीरा सय्यद यांनी केले. श्वेता वीर, ऐश्वर्या राऊत आणि दीपिका गोरे यांनी फोटोग्राफी व जिओ-टॅग केलेली छायाचित्रे काढण्याची जबाबदारी सांभाळली. पाहुण्यांच्या स्वागतासाठी धनराज घोडके आणि जितीन आढाव यांनी सहकार्य केले, तर स्टेज वर्क आणि कार्यक्रम व्यवस्थापनाची जबाबदारी अमृता पटेल आणि राजेश कांबळे यांनी पार पाडली.

स्टुडंट लायब्ररी कमिटीचा लोगो व बॅज तयार करण्याचे काम सुयश गांधी आणि धनराज घोडके यांनी केले. अभिप्राय फॉर्म संकलनाची जबाबदारी सुयश गांधी आणि साई चासकर यांनी सांभाळली. रिफ्रेशमेंट कूपन वाटपासाठी प्रतीक्षा पवार, सानिया शेख, साई चासकर आणि सुयश गांधी यांनी सहकार्य केले. या कामांमध्ये कमिटीच्या इतर सदस्यांनी आणि शिक्षकांनीही सहकार्य केले. विद्यार्थ्यांनी दाखवलेली कार्यतत्परता, शिस्त, संघभावना आणि जबाबदारीची जाणीव कौतुकास्पद ठरली. या सहभागामुळे त्यांना नेतृत्व, संवाद, संघटन आणि कार्यक्रम व्यवस्थापनाची कौशल्ये विकसित करण्याची संधी मिळाली.

कार्यक्रमास विद्यार्थी, प्रशासकीय कर्मचारी आणि प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांकडून अभिप्राय घेण्यात आला. 'वाचन प्रेरणा दिन' आणि 'लेखक-वाचक सुसंवाद' या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचन, ज्ञानार्जन, चिकित्सक विचार आणि आजीवन शिक्षणाची भावना वृद्धिंगत होण्यास मदत झाली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी योगदान देणाऱ्या विद्यार्थी, शिक्षक, स्टुडंट लायब्ररी कमिटी सदस्य आणि आयोजकांचे अभिनंदन व आभार व्यक्त करण्यात आले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## बाष्कळामध्ये बैसो नये







त्याला हौसच बडबडायची. गरज काय कुणी विचारण्याची ? त्याला ती संधीच वाटते आपले ज्ञान पाजळायची. कुणी नाक मुरडतंय, गालात हसतंय, त्याची कशाला पर्वा करायची? कधी कधी काहींचे प्रश्न तर तर्काला धरूनही नसतात. तरी याची उत्तरं येतच असतात. महाभारतात विदुर म्हणतात. शहाण्या माणसानं निर्बुद्धासारखं वागावं. कुणी विचारलं नाही, मग कशाला बोलावं? दुसरा अडचणीत दिसतो. अशा प्रसंगी काय करावं, या विचारात पडतो तो आपली प्रतिष्ठा राखून असतो. आपल्याला सगळं समजतं, असा भाव चेहऱ्यावर आणतो. आणि तरी हा अतिशहाणा आपली बडबड सुरू करतो. कुणी विचारलं नाही, तर मग आपण होऊन बोलू नये. पुष्कळ लोक वेडवाकडे विचारतात. त्यांच्या प्रश्नात ते तर्काला फाटाच देतात. कार्यकारण भाव असावा, त्याचा त्यांनी विचारच केलेला नसावा. आणि तरी आपण उत्तरं देण्याचा उपद्व्याप करावा ? तसा केला तर तो मूर्खपणा ठरावा. शहाण्यानं, जणू आपल्यालाच काहीच कळत नाही बुवा त्यातलं. असा मख्खपणा अवलंबावा. या जगात हाच शहाणपणा समजावा. समर्थ रामदास अशा बडबड करणाऱ्याला बाष्कळ म्हणतात आणि सांगतात की, बाष्कळामध्ये बैसो नये उद्धटासी तंटो नये । आपणाकरिता खंडा नये समाधान जनाचे।।

गरज असो नसो, कुणी न पुसो, तरी बोलतच सुटायचं? हे वागणं बाष्कळ म्हणायचं. अशा बाष्कळांशी संगत करू नये. उद्धटासारखे प्रश्न करतो त्याच्याशी उगाच वाद घालू नये. शांत राहावं. वाद घालण्यात समाधान वाटत असेल तर त्याला ते लुटू देत. आपण कशाला अपमानित व्हायचं ?

ही देवदत्ताची कहाणी पाहा. त्याला एकदा एक वयोवृद्ध शहाणा भेटला. कुठं? एका सभेमध्ये अनेक प्रतिष्ठित लोक होते जमलेले. त्या शहाण्यानं देवदत्ताला पाहिलं. देवदत्ताचं त्या सभेत भाषण होणार होतं. ते भाषण झालं. लोकांनी त्याचं स्वागत केलं. त्या वयोवृद्धाचं मात्र काय बिघडलं कोण जाणे? त्यानं देवदत्ताला तीन चार प्रश्न विचारले आणि उत्तर मागितलं. तो म्हणाला, देवदत्त माझा मुलगा मारुती कार चालवतो. माझी मुलगी ब्युटीपार्लर चालवते. माझ्या नातवाला गोवर-कांजण्या निघाल्यात. तेव्हा माझं वय काय ते सांगा ? ऐकणारे गोंधळले, पण देवदत्त या तर्कविहीन प्रश्नांनी घाबरला नाही. तो धाडकन म्हणाला, तुमच वय ऐंशी. वयोवृद्ध म्हणाला, बरोबर ओळखलेत? पण कसं काय ओळखलंत? जरा इतरांनाही कळू द्या. त्या वृद्धाला वाटलं, आता देवदत्ताची फजिती होणार. त्याचा उद्देशच होता विचारण्यात तसा. पण देवदत्त पुन्हा धाडकन म्हणाला, माझ्या शेजारच्याच्या उदाहरणावरून मी तुमचं वय चटकन ताडलं. माझा शेजारी हाफमॅड आहे व त्याच वय चाळीस आहे, तेव्हा तुमचं ऐंशी असलंच पाहिजे. त्या वयोवृद्धांच तोंड पाहण्यासारखं झालं.

– किशोर गांधी




राधाबाई काळे महिला महाविद्यालयात पटकथा लेखन कार्यशाळा आयोजित करण्यात आला होता.

# राधाबाई काळे महाविद्यालयात पटकथा लेखन कार्यशाळा उत्साहात

नगर – रयत शिक्षण संस्थेचे राधाबाई काळे महिला महाविद्यालय अहिल्यानगर येथे पटकथा लेखन कार्यशाळा व हिंदी दिवस पंधरवडा निमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेचा बक्षीस वितरण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर थोपटे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता. या कार्यशाळेस प्रमुख अतिथी म्हणून सी. टी. बोरा कॉलेज शिरूर येथील हिंदी विभाग प्रमुख डॉ. ईश्वर पवार उपस्थित होते. यावेळी त्यांनी पटकथा लेखनाची संकल्पना, पटकथेची रचना, व्यक्तिरेखा, संवादलेखन तसेच प्रसंगांची मांडणी याबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी सर्जनशीलता, निरीक्षणशक्ती आणि कल्पनाशक्तीचा प्रभावी वापर करून पटकथा लेखन कसे करावे, याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले.

कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून पटकथा लेखनाच्या विविध पैलूंचा अभ्यास केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.भूपेंद्र निकाळजे यांनी केले. डॉ. फातेमा आंबेकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अलसबा शेख, प्रा.नेहा सय्यद यांनी केले. या कार्यक्रमास शिक्षक-शिक्षकेत्तर सेवक उपस्थित होते.

# मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये शारदीय नवरात्रोत्सव अनोखा उपक्रम

## विद्यार्थ्यांनी शिकले भाजी निवडणे, भांडी घासणे ते भाजी-पोळी बनवणे

नगर – शारदीय नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर हिंद सेवा मंडळ संचलित मेहेर इंग्लिश स्कूल, अहिल्यानगर येथे विद्यार्थ्यांसाठी जीवन कौशल्यावर आधारित अनोख्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. हे उपक्रम विद्यार्थ्यांच्या दैनंदिन कामांवर आधारित होते. वर्गानुसार उपक्रमांची विभागणी करण्यात आली होती. या उपक्रमांसाठी शाळेचे चेअरमन जगदीश झालानी व मुख्याध्यापिका अनुरिता झगडे यांचे मार्गदर्शन व सहशिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.



उपक्रमांचा तपशील पुढीलप्रमाणे –इ. १ ली व २ री प्रत्येक विद्यार्थ्याला घरून मेथीच्या भाजीच्या १०–१२ काड्या व मोठी कटोरी आणण्यास सांगितले होते. विद्यार्थ्यांनी आनंदाने भाजी निवडण्याचे प्रशिक्षण घेतले.

इ.३ री व ४ थी च्या विद्यार्थ्यांनी शर्ट, बटण, सुई-धागा आणून प्रत्यक्ष शर्टाला बटणे लावण्याचा सराव केला.

इ. ५ वी व ६ वी च्या विद्यार्थ्यांनी घरून ताट, वाटी, छोटी प्लेट, ग्लास, तांब्या, साबण व घासणी आणली व आपापली भांडी स्वच्छ घासून, धुवून दाखविली.

इ.७ वी व ८ वी च्या विद्यार्थ्यांना भाजी-पोळी बनवण्याचे प्रात्यक्षिक देण्यात आले. यासाठी पीठ, मीठ, पोळपाट, लाटणे, तेल, मूगडाळ, कांदा, टोमॅटो व इतर साहित्य विद्यार्थ्यांनी घरून आणले होते.

यासाठी मुलांचा व मुलींचा असे दोन गट करण्यात आले होते. मुलांनी मूगडाळीची भाजी तयार केली. तर मुलींनी पोळ्या लाटल्या. हा सर्व स्वयंपाक शाळेच्या आवारात चूल मांडून मुख्याध्यापिका अनुरिता झगडे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने तयार करण्यात आला.

यावेळी चेअरमन जगदीश झालानी म्हणाले की, आजच्या स्पर्धेच्या युगात फक्त पुस्तकी ज्ञान पुरेसे नाही. मुलांना स्वावलंबी बनवणे, हीच खरी शिक्षणाची कसोटी आहे. स्वतःची भांडी घासणे, भाजी निवडणे किंवा स्वतःचा स्वयंपाक करणे, ही कामे लहान वाटत असली तरी यातून मुलांमध्ये आत्मविश्वास, श्रमाची प्रतिष्ठा आणि व्यवस्थापन कौशल्य विकसित होते.

प्राचार्य अनुरीता झगडे म्हणाले, शारदीय नवरात्र उत्सवानिमित्त शाळेतील माता पालकांसाठी साबुदाणा विरहित उपवासाचे पदार्थ बनविण्याची स्पर्धा तसेच शाळेतील शिक्षकांसाठी व्यक्तिमत्व विकासाच्या विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भाजी-पोळीचा सर्वांनी आस्वाद घेतला.

# कॉ.भागवत वादविवाद स्पर्धेत न्यू आर्टस्, पारनेरला विजेतेपद



नगर – कॉम्रेड एकनाथराव भागवत यांच्या स्मृतिनिमित्त न्यू आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज (स्वायत्त), अहिल्यानगर मध्ये ६ व ७ ऑक्टोबर रोजी आयोजित दोन दिवसीय राज्यस्तरीय वाद विवाद व वक्तृत्व स्पर्धेमध्ये आकाश मोहिते व महेश उशीर, न्यू आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, पारनेर कॉलेजच्या संघाने वाद विवाद स्पर्धेमध्ये प्रथम व वक्तृत्व स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक मिळवला. तुलसी काळे व सिद्धी बाफना, जिजामाता महाविद्यालय, भेंडा यांनी वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक तर संपदा लांडगे व दिग्विजय येवले, न्यू लॉ कॉलेज, अहिल्यानगर यांनी वाद विवाद स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक मिळवला. वाद विवाद स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक प्रथमेश गिरी व वैभव बंगाळे, माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी पटकावला. तर याच महाविद्यालयाच्या कार्तिकी कराड व साक्षी मुंढे यांनी वक्तृत्व स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळविला. वाद विवाद स्पर्धेमध्ये चतुर्थ क्रमांक तनिष्क साळवी व सानवी लिखे, रेसिडेन्सीअल ज्यू. कॉलेज, अहिल्यानगर तर वक्तृत्व स्पर्धेतील चतुर्थ क्रमांक शेख इरफान व दीपिका सावंत, मालपाणी लॉ कॉलेज, संगमनेर यांनी पटकावला. निखील बोडखे, न्यू आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, शेवगाव आणि शेख इरफान, मालपाणी लॉ कॉलेज, संगमनेर यांना वादविवाद स्पर्धेसाठी उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले. अक्षदा भराट, ज्ञानेश्वर महाविद्यालय, नेवासा व ऋतुजा गावडे यांना वक्तृत्व स्पर्धेसाठी उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले. तनिष्क साळवी व सानवी लिखे या रेसिडेन्शिअल ज्युनिअर कॉलेजच्या संघाने ज्युनिअर कॉलेज गटातील वादविवाद स्पर्धेचे विजेतेपद मिळवले.

पारितोषिक वितरणाच्या समारोप समारंभासाठी सौदाळा गावाचे सरपंच शरद आरगडे हे प्रमुख पाहुणे तर अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांनी सौदाळा गावात राबवलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. यामध्ये देशातील पहिली जातमुक्त ग्रामपंचायत, शिवी दिल्यास ५०० दंड करणारी राज्यातील पहिली ग्रामपंचायत, वृद्ध व अनाथ दांपत्यास जेवणाची व्यवस्था, ५ रू मध्ये २० लिटर थंड व शुद्ध पाणी अशा अनेक उपक्रमांची त्यांनी माहिती दिली. या स्पर्धेसाठी प्रा.डॉ. गजानन चव्हाण, सहयोगी प्राध्यापक, वीर वाजेकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, फुंदे, रायगड व ऋतुजा म्हात्रे, महामुनी, मॉडर्न स्कूल अॅण्ड ज्युनियर कॉलेज, वाशी, नवी मुंबई यांनी परिक्षक म्हणून काम पाहिले.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे स्पर्धक विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

प्रास्ताविक वाणिज्य शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय कळमकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. मनीषा तोडकरी यांनी केले. प्रा.नागेश शेळके यांनी आभार मानले.

# कैसर एज्युकेशन फाउंडेशन विद्यालयात घनकचरा व्यवस्थापनाविषयी जनजागृती

नगर – स्वच्छ भारत अभियान अंतर्गत माहिती, शिक्षण प्रसार व जनजागृती या घटकाचा अवलंब करून कैसर एज्युकेशन फाउंडेशन स्कूल तपोवन रोड,सावेडी, अहमदनगर येथे विद्यार्थ्यांसाठी घनकचरा व्यवस्थापन या विषयावर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून श्रीमती सुवर्णा वाघ यांनी आपल्या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व, कचऱ्याचे विविध प्रकार, कचऱ्याचे योग्य वर्गीकरण, स्वच्छतेच्या चांगल्या-सवयी व '७ आर' संकल्पना तसेच कचऱ्याच्या उगमापासून ते अंतिम व्यवस्थापनापर्यंतचा प्रवास याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. दैनंदिन जीवनात कचऱ्याची विल्हेवाट लावणे, ओला व सुका कचरा वेगवेगळा करणे, कचऱ्याचा पुनर्वापर व पुनर्चक्रीकरण करणे आणि परिसर स्वच्छ ठेवणे यांसारख्या महत्त्वपूर्ण बाबींवर विद्यार्थ्यांचे लक्ष वेधण्यात आले. कार्यक्रमादरम्यान प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात आला. त्यामुळे विद्यार्थ्यांना घनकचरा व्यवस्थापनाची संकल्पना समजून घेण्यास मदत झाली. तसेच



स्वच्छता ही केवळ वैयक्तिक सवय नसून ती सामाजिक जबाबदारी आहे याची जाणीव करून देण्यात आली. पर्यावरणाचे रक्षण, प्रदूषणावर नियंत्रण आणि स्वच्छ परिसराची निर्मिती यासाठी प्रत्येक नागरिकाने सक्रिय सहभाग घेणे आवश्यक असल्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. कार्यक्रमास विद्यालयाच्या डायरेक्टर सौ. काजल कैसर आणि विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. सोनाली गायकवाड यांच्यासह शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

सूत्रसंचालन गीता कपूर यांनी केले. सौ. विजया शेळके यांनी आभार मानले.

# एमपीएससी आंदोलनातील मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने कमल एज्युकेशन सोसायटीच्या विद्यार्थ्यांमध्ये आनंद

## विद्यार्थ्यांच्या एकजुटीचा विजय; चौकशी समितीच्या निर्णयाचे स्वागत परीक्षा अधिक पारदर्शक होण्याची विद्यार्थ्यांना अपेक्षा

नगर – महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांशी संबंधित विविध मागण्यांसाठी पुणे येथे विद्यार्थ्यांनी केलेल्या आंदोलनाला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने राज्यभरातील स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यार्थ्यांच्या एकजुटीला मिळालेले यश आणि त्यांच्या समस्यांची शासनाने घेतलेली दखल यामुळे प्रशासकीय सेवेत अधिकारी होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या तरुणांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर अहिल्यानगरमधील बालिकाश्रम रोडवरील एमपीएससी परीक्षांच्या तयारीचे प्रमुख केंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कमल एज्युकेशन सोसायटीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करत आंदोलनातील मागण्यांना मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादाचे स्वागत केले.

एमपीएससी परीक्षांच्या प्रक्रियेतील कथित गैरप्रकार, परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी, निकालांबाबत निर्माण होणारे प्रश्न आणि भरती प्रक्रियेतील पारदर्शकतेची गरज या मुद्द्यांवरून विद्यार्थ्यांमध्ये अनेक दिवसांपासून अस्वस्थता होती. प्रशासकीय सेवेत जाण्यासाठी विद्यार्थी अनेक वर्षे अभ्यास करतात. त्यासाठी आर्थिक, मानसिक आणि सामाजिक पातळीवर मोठा संघर्ष करावा लागतो. अशा परिस्थितीत परीक्षा प्रक्रियेबाबत प्रश्न निर्माण झाल्यास विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर आणि भवितव्यावर परिणाम होण्याची भीती असते. त्यामुळे पुण्यातील आंदोलनातून विद्यार्थ्यांनी आपल्या मागण्या ठामपणे मांडल्या. या आंदोलनामुळे विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधले गेले असून, चौकशी समिती स्थापन करण्यासह सुधारणा करण्याच्या दिशेने झालेल्या निर्णयांचे विद्यार्थ्यांनी स्वागत केले आहे.



सौ. सोनल वारे



राकेश शिंदे



ज्ञानेश्वर मुळे

यावेळी कमल एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा सौ. सोनल स्वप्निल वारे यांनी सांगितले की, संघर्ष केवळ नोकरीसाठी नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी असल्याने विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचे महत्त्व वाढले त्या पुढे म्हणाल्या, एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला सरकारने दिलेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे आगामी काळात परीक्षा अधिक पारदर्शक होतील,अशी अपेक्षा आहे. विद्यार्थ्यांनी व्यक्त केलेल्या समस्या गांभीर्याने घेऊन परीक्षा प्रक्रियेतील त्रुटी दूर करणे आवश्यक आहे. प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना न्याय मिळणे ही संपूर्ण व्यवस्थेची जबाबदारी आहे.यावेळी

विद्यार्थी ज्ञानेश्वर मुळे यांनी आंदोलना मागील भूमिका स्पष्ट करताना सांगितले, आमची लढाई कोणत्याही व्यक्तीशी नव्हती, तर भ्रष्ट आणि संथ व्यवस्थेशी होती. चौकशी समिती स्थापन होणे हा आमचा पहिला विजय आहे; मात्र अंतिम अहवाल येईपर्यंत आणि दोषींवर कारवाई होईपर्यंत आम्ही शांत बसणार नाही. त्यांच्या या प्रतिक्रियेतून विद्यार्थ्यांचा संघर्ष केवळ आश्वासनांपुरता मर्यादित नसून, प्रत्यक्ष कार्यवाही आणि दोषींवरील कारवाईपर्यंत सुरू ठेवण्याचा निर्धार स्पष्ट होतो. असे मत व्यक्त केले. यावेळी

विद्यार्थी राकेश शिंदे यांनीही या निर्णयाचे स्वागत केले. ते म्हणाले, विद्यार्थ्यांच्या भावनांचा विचार करून घेतलेला हा निर्णय एमपीएससीच्या इतिहासातील सकारात्मक बदलाची नांदी ठरो, हीच अपेक्षा आहे. परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकता वाढविणे, विद्यार्थ्यांच्या तक्रारींची योग्य पद्धतीने दखल घेणे आणि भरती प्रक्रियेबाबत विश्वास निर्माण करणे या बाबी आगामी काळात महत्त्वाच्या ठरणार असल्याचे मत विद्यार्थ्यांनी व्यक्त केले.

एमपीएससी परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक परीक्षा ही त्यांच्या भवितव्याच्या दृष्टीने महत्त्वाची असते. अनेक विद्यार्थी ग्रामीण भागातून अहिल्यानगरसारख्या शहरांमध्ये येऊन अभ्यास करतात. मर्यादित आर्थिक साधने, राहण्याचा खर्च, अभ्यासासाठी लागणारा वेळ आणि कुटुंबाच्या अपेक्षा यांचा सामना करत ते प्रशासकीय अधिकारी होण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील असतात. त्यामुळे परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता आणि समान संधी उपलब्ध होणे आवश्यक आहे. आंदोलनातून विद्यार्थ्यांनी मांडलेल्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय झाल्याने या प्रक्रियेत सुधारणा होण्याची आशा निर्माण झाली आहे.

मात्र, चौकशी समितीचा अंतिम अहवाल, त्यानुसार होणारी कार्यवाही आणि भविष्यातील परीक्षांमध्ये प्रत्यक्ष दिसणाऱ्या सुधारणा या बाबीही तितक्याच महत्त्वाच्या आहेत. केवळ आश्वासने न देता परीक्षा प्रक्रियेतील त्रुटी दूर करून विद्यार्थ्यांचा विश्वास संपादन करणे गरजेचे आहे. आंदोलनातून निर्माण झालेला दबाव हा सकारात्मक बदलासाठी उपयोगी ठरावा, अशी अपेक्षा विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

कमल एज्युकेशन सोसायटीमध्ये यावेळी विद्यार्थ्यांनी आंदोलन, त्यातून पुढे आलेले प्रश्न आणि भविष्यातील परीक्षा प्रक्रियेबाबत चर्चा केली. याप्रसंगी अतुल खेडकर, विकास सानप, हर्षद घुले, अक्षय विधाते, राहुल कुलाल, विशाल देठे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. तसेच मोनिका बोरूडे, सविता पोटे, मयुरी गाडेकर, अक्षरा भालशंकर, दुर्गा चौगुले, राधिका मिसाळ, सात्विक देशमुख, सुप्रिया गटकळ, प्रांजल काळे यांच्यासह विद्यार्थिनींनीही आपल्या भावना व्यक्त केल्या.

विद्यार्थ्यांच्या एकजुटीमुळे त्यांच्या प्रश्नांना व्यापक व्यासपीठ मिळू शकते, हे या आंदोलनातून अधोरेखित झाले आहे. एमपीएससी परीक्षांमध्ये पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि गुणवत्तेला प्राधान्य मिळाल्यास प्रामाणिकपणे मेहनत करणाऱ्या उमेदवारांना न्याय मिळण्यास मदत होईल. त्यामुळे आंदोलनातील मागण्यांवर पुढील काळात प्रभावी अंमलबजावणी होणे, हीच विद्यार्थ्यांची प्रमुख अपेक्षा आहे.

# २० व्या चाचणीतून अहिल्यानगरच्या १३ खेळाडूंची हैदराबाद येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड



अहिल्यानगर जिल्हा अॅथलेटिक्स संघटनेच्या वतीने आयोजित २० व्या आंतर जिल्हा राष्ट्रीय अॅथलेटिक्स-अहिल्यानगर जिल्हा संघ निवड चाचणी (२०२६) पारनेर येथील 'न्यू आर्टस् कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज'च्या मैदानावर पार पडली.

नगर – अहिल्यानगर जिल्हा अॅथलेटिक्स संघटनेच्या वतीने आयोजित २० व्या आंतर जिल्हा राष्ट्रीय अॅथलेटिक्स-अहिल्यानगर जिल्हा संघ निवड चाचणी (२०२६) पारनेर येथील 'न्यू आर्टस् कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज'च्या मैदानावर पार पडली. या निवड चाचणीतून जिल्ह्याचे राष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व करण्यासाठी १३ गुणवंत खेळाडूंची निवड करण्यात आली आहे.

या निवड चाचणीचे उद्घाटन अहिल्यानगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या न्यू आर्टस् कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांच्या हस्ते पार पडले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कॉलेजचे क्रीडा संचालक प्रा. डॉ. संजय गायकवाड, एनसीसी विभागप्रमुख प्रा. भरत डगळे, प्रा. गंगाराम खोडदे, न्यू इंग्लिश स्कूलचे क्रीडा प्रमुख तथा तालुका शालेय क्रीडा अध्यक्ष बापूराव होळकर, एम.ई.टी. स्कूलचे फिजिकल डायरेक्टर अक्षय शिंदे, आणि स्टेला मारीस हंगाचे ऋषीकेश औटी उपस्थित होते.

स्पर्धेचे पंच व व्यवस्थापक म्हणून श्रीरामसेतू आवारी, संदीप घावटे, गुलजार शेख, बापूसाहेब गायकवाड, सौरभ वरखडे, समीर शेख, गणेश आघाडे, सतीश भालेराव आणि अरविंद दिवे यांनी काम पाहिले.

राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेले १३ खेळाडूंची निवड करण्यात आलेली आहे. या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे पूर्ण भारत देशामधून प्रत्येक जिल्ह्यामधून १३ खेळाडूंचा संघ या ठिकाणी उपस्थित राहणार आहे. या राष्ट्रीय स्पर्धेसाठी सहभागी होणाऱ्या खेळाडूंची राहण्याची व जेवणाची व्यवस्था करण्यात येणार आहे. या स्पर्धेचे आयोजन अॅथलेटिक्स फेडरेशन ऑफ इंडिया व हैदराबाद सरकार करणार आहे.

निवड झालेले हे खेळाडू आगामी राष्ट्रीय स्पर्धा हैदराबाद (१४ व १६ नोव्हेंबर) येथे होणाऱ्या आंतर जिल्हा राष्ट्रीय अॅथलेटिक्स स्पर्धेत अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतील, अशी माहिती स्पर्धा आयोजक दिनेश भालेराव यांनी माहिती दिली.

खेळाडूंचे अध्यक्ष सुनील जाधव, उपाध्यक्ष राजेंद्र कोतकर, प्रसाद डागवाले यांच्यासह अहिल्यानगर जिल्हा अॅथलेटिक्स संघटनेचे पदाधिकारी, क्रीडाप्रेमींनी अभिनंदन करून खेळाडूंना राष्ट्रीय स्पर्धेतील पुढील कामगिरीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



आंतरशालेय स्पर्धेत विजय मिळवलेले द आयकॉन पब्लिक स्कूलमधील मुलींचा बास्केटबॉल संघ.

## बास्केटबॉलमध्ये आयकॉनच्या मुलींची विजयी पताका

### १४ वर्षांखालील संघाची हॅटट्रिक, १७ वर्षांखालील संघाची विभागीय स्पर्धेसाठी निवड

नगर – द आयकॉन पब्लिक स्कूलच्या मुलींच्या बास्केटबॉल संघांनी आंतरशालेय स्पर्धेत विजय मिळवत शाळेचा गौरव वाढवला. दोन्ही संघांनी अशोकभाऊ फिरोदिया हायस्कूलच्या संघांना पराभूत करत विजेतेपदाची परंपरा कायम राखली.

१४ वर्षांखालील मुलींच्या संघाने २१-९ अशा गुण फरकाने विजय मिळवत सलग तिसऱ्या वर्षी आपली विजयी परंपरा कायम राखली. तर १७ वर्षांखालील संघाने २२-१० अशा फरकाने विजय मिळवून विभागीय बास्केटबॉल स्पर्धेसाठी पात्रता मिळवली.

या विजयात १७ वर्षांखालील गटातील वैष्णवी जगताप, इशिता ठुबे, राधिका पाटील, तनिष्का जगताप, आरना करनावत व अस्मि खताळ, तसेच १४ वर्षांखालील गटातील तेजस्विनी पाटील, माही माने, आरना कटारे, श्रेया वर्मा, उर्वी वारुळे व तनिष्का चंगेडिया यांनी योगदान दिले.

खेळाडूंना प्रशिक्षक सचिन भापकर यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा मंगला मुथा, चेअरमन अशोक मुथा, संचालक (प्रशासन) कर्नल आर. सी. राणा, ट्रस्टी निर्मल मुथा, अमित मुथा, प्राचार्या दीपिका नगरवाला यांनी खेळाडू व प्रशिक्षकांचे अभिनंदन केले आहे.



विजेता करंडक क्रिकेट स्पर्धेचे माहिती पत्रक व प्रवेश अर्ज श्री विशाल गणपतीस अर्पण करताना नरेंद्र फिरोदिया.

## विजेता करंडक क्रिकेट स्पर्धेचे माहिती पत्रक व प्रवेश अर्ज ग्रामदैवत विशाल गणपतीस अर्पण

नगर – जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे माजी सेक्रेटरी स्व.संजय बोरा यांच्या स्मरणार्थ नगर शहरात 'विजेता क्रिकेट लीग' या डे अॅण्ड नाईट पद्धतीने टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. वाडीयापार्क मैदानावर १० ते २० डिसेंबर या कालावधीत होणार आहेत. विजेत्या संघास रुपये १ लाख व करंडक व उपविजेत्या संघास रुपये ७१ हजार व करंडक तसेच इतर हजारो रुपयांची पारितोषिके देण्यात येणार आहे, अशी माहिती विनीत बोरा यांनी दिली.

स्पर्धेचे माहिती पत्रक व प्रवेश अर्ज ग्रामदैवत श्री विशाल गणपतीच्या चरणी उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते अर्पण करून श्री गणेशाची आरती केली. यावेळी मंदिराचे महंत संगमनाथ महाराज, जैन कॉन्फरन्सचे मार्गदर्शक अशोकबाबू बोरा आदींसह क्लबचे सदस्य उपस्थित होते.

या स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी हर्ष बोरा, मोबाईल नंबर ९६८९३९७०२९ या नंबरवर संपर्क साधावा.

## 'मराठा चेंबर्स व इपीएफओ'तर्फे अहिल्यानगरमध्ये भविष्य निर्वाह निधी जनजागृती व संवाद कार्यक्रम

### भविष्य निर्वाह निधी नियम, कर्मचारी नोंदणी आणि वैधानिक अनुपालनावर मार्गदर्शन





नगर – उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधींना कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या विविध उपक्रमांची, अद्ययावत नियमांची आणि वैधानिक अनुपालनाच्या आवश्यकतांची माहिती व्हावी, या उद्देशाने मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अॅण्ड अॅग्रिकल्चर, अहिल्यानगर आणि EPFO च्या अहिल्यानगर जिल्हा कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने भविष्य निर्वाह निधी जनजागृती व संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात कर्मचारी नोंदणी प्रक्रिया, भविष्य निर्वाह निधीशी संबंधित तरतुदी, कल्याणकारी योजना आणि कर्मचारी लाभ यांविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमात प्रादेशिक भविष्य निर्वाह निधी आयुक्त-१ अतुल कोतकर आणि सहाय्यक भविष्य निर्वाह निधी आयुक्त, अहिल्यानगर, कल्याण अष्टिकर यांनी विविध उद्योग कंपन्यांना / प्रतिनिधींना मार्गदर्शन केले. भविष्य निर्वाह निधीशी संबंधित नियम व तरतुदी, अनुपालनाच्या जबाबदाऱ्या आणि EPFO च्या विविध उपक्रमांची माहिती त्यांनी दिली. या मार्गदर्शनामुळे उद्योग प्रतिनिधींना संबंधित नियमांची समज वाढविण्यास तसेच अनुपालन प्रक्रियेबाबतच्या शंकांचे निरसन करून घेण्यास मदत झाली.

MCCIA, अहिल्यानगरचे अध्यक्ष अरविंद परगावकर यांनीही उपस्थितांना संबोधित केले. उद्योग क्षेत्राने भविष्य निर्वाह निधीच्या नियमांमधील बदल आणि वैधानिक अनुपालनासंबंधीच्या अद्ययावत तरतुदींची माहिती वेळोवेळी करून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. उद्योग आणि संबंधित सरकारी यंत्रणा यांच्यात प्रभावी समन्वय राहिल्यास कर्मचारी कल्याणाच्या योजनांची अंमलबजावणी अधिक सुलभ होऊ शकते, असे या कार्यक्रमाच्या माध्यमातून स्पष्ट झाले.

कार्यक्रमातील संवादात्मक सत्र हे विशेष महत्त्वाचे ठरले. या सत्रात उद्योग प्रतिनिधींना EPFO च्या अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधता आला. भविष्य निर्वाह निधीचे प्रशासन, कर्मचारी नोंदणी, विविध नियमांची अंमलबजावणी आणि कर्मचारी कल्याणाशी संबंधित तरतुदींविषयी त्यांनी माहिती जाणून घेतली. तसेच आपल्या शंकांचे निरसन करून संबंधित प्रक्रियांबाबत अधिक स्पष्टता मिळविण्याची संधी त्यांना उपलब्ध झाली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन MCCIA च्या HR फोरम समितीचे सदस्य श्रीकांत गाडे यांनी केले.



राज्यस्तरीय याजकीय सन्मान सोहळ्यात महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील ६० याजकांचा सन्मान करण्यात आला.

## राज्यस्तरीय याजकीय सन्मान सोहळ्यात ६० याजकांचा गौरव

### अहिल्यानगर येथे विविध जिल्ह्यांतील याजकांचा सन्मान

नगर – स्व. अशोक श्रीसुंदर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, छत्रपती संभाजीनगर आणि साप्ताहिक उपदेशक, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय याजकीय सन्मान सोहळ्यात महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील ६० याजकांचा सन्मान करण्यात आला. संजोग लॉन येथे सुशिलाताई श्रीसुंदर यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा पार पडला.

कार्यक्रमाचे उद्घाटन रेव्ह. सतीश तोरणे यांच्या हस्ते झाले. यावेळी रेव्ह. रवी चांदेकर, स्टिवन गोडे, अॅड. विनायक पंडित, रेव्ह. सुनंदा त्रिभुवन, पा. दशरथ रणपिसे, बिशप शमुवेल भिंगारदिवे, प्रेषित सुनील गंगावणे, शरयू किशोर ब्राह्मणे आणि पंकज चांदोरकर आदी उपस्थित होते.

साप्ताहिक उपदेशकचे संपादक जॉर्ज क्षेत्रे यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या सामाजिक कार्याचा आढावा घेतला.

अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, पुणे, मुंबई, जालना यांसह महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून आलेल्या याजकांचा या सोहळ्यात सन्मान करण्यात आला. सी.एन.आय., सॅल्व्हेशन आर्मी तसेच स्वतंत्र आचार्यांचा सन्मानपत्र, मानचिन्ह, पदक आणि शाल देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाल पटेकर यांनी केले, तर विक्रम गायकवाड यांनी आभार मानले.

रेव्ह. दीपक पाडळे यांनी समारोपाची प्रार्थना केली, तर रेव्ह. गंगोदक यांनी आशीर्वाद दिले.

भोजनापूर्वी रेव्ह. आनोश शिरसाठ यांनी प्रार्थना केली. कार्यक्रमानंतर उपस्थितांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी विक्रम गायकवाड, रेव्ह. रवी चांदेकर, रेव्ह. सतीश तोरणे, रेव्ह. दीपक पाडळे, ब्रदर प्रवीण साबळे, ब्रदर सुधाकर पाटोळे, ब्रदर लुकस पाटोळे आणि कविता विक्रम गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

## दीर्घकालीन भांडवली नफा करमुक्त व्हावा : राजेश देशपांडे



पणजी येथील कर सल्लागारांच्या व्यवसायिक परिषदेत अहिल्यानगरचे अर्थ व गुंतवणूकतज्ज्ञ राजेश देशपांडे यांचे स्वागत करण्यात आले.

नगर – सद्यस्थितीत शेअर्स व म्युच्युअल फंडातील दीर्घकालीन भांडवली नफा करमुक्त करण्याची हीच योग्य वेळ आहे, अशी मागणी देशभरातील गुंतवणूक सल्लागारांनी पणजी येथील व्यवसायायिक परिषदेत केली असल्याचे अहिल्यानगरचे अर्थ व गुंतवणूकतज्ज्ञ राजेश देशपांडे यांनी सांगितले. या परिषदेत पंतप्रधान आर्थिक सल्लागार समितीचे अध्यक्ष महेंद्र देव तसेच कोटक एएमसीचे मॅनेजिंग डायरेक्टर व सीईओ नीलेश शहा तसेच अनेक वित्तीय व्यवस्थापक उपस्थित होते.

मागील दोन वर्षांपासून विदेशी गुंतवणूकदारांच्या जोरदार विक्रीतही भारतीय सामान्य गुंतवणूकदार मात्र भारतीय अर्थव्यवस्था, केंद्र सरकार व कॉर्पोरेट सेक्टरवरील विश्वास कायम ठेवून इक्विटी म्युच्युअल फंड, शेअर्समधील खरेदी सातत्याने करीत आहे. अस्थिर जागतिक परिस्थितीत वाढणार्या महागाईतही हा गुंतवणूकदार प्रसंगी काटकसर करून आपल्या मुलांच्या व स्वतः च्या कुटुंबाच्या दीर्घकालीन उज्वल भवितव्यासाठी भारतीय भांडवली बाजारात गुंतवणूक करीत आहे, अशी भूमिका या परिषदेत मांडण्यात आली.

या परिषदेमध्ये निरनिराळ्या तज्ज्ञांनी आपली मते व्यक्त केली. आखातातील तणाव, जागतिक स्थिती, अमेरिकेवरील कर्जाचे वाढते प्रमाण, कृत्रिम बुद्धिमत्तेचा भारतीय व्यवसायांवर होणारा परिणाम तसेच यावर्षीच्या अपुऱ्या पावसामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम व रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या (आरबीआय) भविष्यकाळातील संभाव्य उपाययोजना याबाबत चर्चा झाली.

पंतप्रधान आर्थिक सल्लागार समितीचे अध्यक्ष महेंद्र देव यांनी २०४७ पर्यंत विकसित भारताचे रोड मॅप कसे असेल हे सविस्तरपणे स्पष्ट केले. नीलेश शहा यांनी त्यांचा भांडवली बाजारातील मागील ३० वर्षांच्या अनेक चढउतारांचा अनुभव सांगून भारतीय भांडवली बाजाराचे दीर्घकालीन भविष्य यापेक्षाही उज्वल असल्याचे यावेळी सांगितले.

## सोशल मीडियावरील प्रलोभनांना बळी पडू नका; सतर्कतेमुळे सायबर फसवणूक टळू शकते

### पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांचे प्रतिपादन; जिल्ह्यात वर्षभरात ५ हजार सायबर गुन्ह्यांची नोंद; नागरिकांची ३६० कोटी रुपयांची फसवणूक



महालक्ष्मी लॉन्स येथे सायबर सुरक्षा जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. (छायाचित्र – लहू दळवी)

नगर – आधुनिक तंत्रज्ञानाचा गैरवापर करून सायबर फसवणुकीचे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत. सोशल मीडियावरील प्रलोभने, बनावट जाहिराती आणि अनोळखी व्यक्तींकडून होणाऱ्या आर्थिक व्यवहारांमुळे नागरिकांची फसवणूक होत आहे. मात्र, अकारण भीती आणि मोह टाळून योग्य ती सतर्कता बाळगल्यास सायबर गुन्ह्यांना आळा घालता येऊ शकतो, असे प्रतिपादन सायबर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांनी केले.

अॅड. युवराज शिंदे यांच्या सहकार्याने कल्याण रोड परिसरातील महालक्ष्मी लॉन्स येथे नागरिकांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सागर ढिकले यांनी उपस्थित नागरिकांना सायबर फसवणुकीचे विविध प्रकार, त्यापासून बचाव करण्याचे उपाय आणि फसवणूक झाल्यास करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

सागर ढिकले म्हणाले की, जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण ऑक्टोबर महिन्यात सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. नवरात्रोत्सव, दसरा आणि दिवाळी या सणासुदीच्या काळात नागरिक मोठ्या प्रमाणावर ऑनलाइन खरेदी करतात. याच काळात सोशल मीडियावर आकर्षक ऑफर, बनावट जाहिराती आणि प्रलोभने दाखवून नागरिकांची फसवणूक करण्याचे प्रकार घडतात. त्यामुळे ऑनलाइन व्यवहार करताना विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. गेल्या वर्षभरात अहिल्यानगर जिल्ह्यात पाच हजार सायबर गुन्ह्यांची नोंद झाली असून, या माध्यमातून नागरिकांची तब्बल ३६० कोटी रुपयांची फसवणूक झाली आहे. ही बाब गंभीर असून, प्रत्येक नागरिकाने सायबर सुरक्षेबाबत जागरूक राहणे गरजेचे आहे.

स्मार्टफोन आणि सोशल मीडियाचा वापर करताना विशेष दक्षता घ्यावी. बँक, महावितरण, फोन पे, गुगल पे, अॅमेझॉन, आर्मी किंवा अन्य कोणत्याही संस्थेचा अधिकारी असल्याचे भासवून संपर्क साधणाऱ्या अनोळखी व्यक्तींना बँक खात्याची माहिती, एटीएम किंवा क्रेडिट कार्डची माहिती तसेच ओटीपी देऊ नये. अशा व्यक्तींच्या सांगण्यावरून कोणतेही अॅप डाउनलोड करू नये. अनोळखी व्यक्तींनी पाठवलेल्या लिंक उघडणे किंवा त्यांच्या सांगण्यावरून क्यूआर कोड स्कॅन करणे टाळावे. ओएलएक्स, फेसबुक, इन्स्टाग्राम, क्विकर यांसारख्या ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर अनोळखी व्यक्तींशी व्यवहार करताना खबरदारी घ्यावी. वस्तू खरेदी-विक्रीच्या नावाखाली सांगितल्याप्रमाणे पैसे पाठवू नयेत. शेअर बाजारात गुंतवणुकीतून मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवणाऱ्या अनोळखी व्यक्तींवर विश्वास ठेवून पैसे गुंतवू नयेत. तसेच अनधिकृत लोन अॅपच्या माध्यमातून कर्ज घेणे टाळावे. अशा प्रकारांतूनही मोठ्या प्रमाणात फसवणूक होत असल्याचे त्यांनी सांगितले.

फेसबुक, इन्स्टाग्राम, जी-मेल आणि व्हॉट्सअॅप या खात्यांमध्ये 'टू-स्टेप व्हेरिफिकेशन' ही सुविधा सुरू केल्यास सोशल मीडिया खाती हॅक होण्याचा धोका कमी करता येतो. अनोळखी व्यक्तींकडून आलेल्या फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारताना सावध राहावे आणि वैयक्तिक माहिती अनोळखी व्यक्तींना देऊ नये.

अलीकडच्या काळात 'डिजिटल अरेस्ट'च्या नावाखाली नागरिकांना घाबरवून आर्थिक फसवणूक करण्याचे प्रकार समोर येत आहेत. कायदेशीर कारवाई सुरू असल्याचे सांगून किंवा पोलीस व अन्य तपास यंत्रणांचे अधिकारी असल्याचे भासवून नागरिकांवर दबाव आणला जातो. मात्र, 'डिजिटल अरेस्ट'च्या नावाखाली अशा प्रकारे नागरिकांना घरी किंवा ऑनलाइन माध्यमातून ताब्यात ठेवण्याची कायदेशीर प्रक्रिया अस्तित्वात नाही. त्यामुळे अशा फोन कॉल्सना घाबरून पैसे पाठवू नयेत व वैयक्तिक माहिती देऊ नये, असे आवाहन त्यांनी केले.

सायबर फसवणुकीची अनेक उदाहरणे देत त्यांनी नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन केले. कोणत्याही अनोळखी व्यक्तीला ओटीपी देऊ नये, सोशल मीडियावरील फसव्या जाहिरातींच्या मोहाला बळी पडू नये आणि आर्थिक व्यवहार करताना खात्री करूनच पुढील कार्यवाही करावी. सायबर फसवणूक झाल्यास तातडीने १९३० या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच जवळच्या पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवावी किंवा राष्ट्रीय सायबर गुन्हे तक्रार पोर्टल या संकेतस्थळावर ऑनलाइन तक्रार दाखल करावी, अशी माहिती त्यांनी दिली.

अॅड. युवराज शिंदे म्हणाले, कल्याण रोड परिसरातील नागरिकांची ऑनलाइन आर्थिक फसवणूक होऊ नये, या उद्देशाने जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली या सायबर सुरक्षा मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. सागर ढिकले यांनी नागरिकांना सविस्तर माहिती दिल्यामुळे त्यांच्यामध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली. यापुढील काळातही समाजहिताची विविध कामे हाती घेण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष लालचंद्र हराळ यांनी सायबर सुरक्षेबाबत मनोगत व्यक्त केले.

सूत्रसंचालन पारुनाथ ढोकळे यांनी केले, तर प्रा. भगवान काटे यांनी आभार मानले.

यावेळी लालचंद्र हराळ, पारुनाथ ढोकळे, प्रा. भगवान काटे, विलास साठे, राजेंद्र शिंदे, आनंद शितोळे, महानगर ज्येष्ठ नागरिक संघाचे सचिव भाऊसाहेब थोटे, माजी प्राचार्य उत्तमराव राजळे, देवा होले, शिवाजी शिंदे, अंकुश गायकवाड, अभय ललवाणी, भानुदास जगताप, दिनकर आघाव, आरवडे मेजर, अभय शेंडगे, हौसराव पवार, सुभाष बर्वे, एल. बी. म्हस्के, शेषराव आगळे, गणेश बेरड, सचिन झावरे, अशोक जगताप, नारायण करांडे, शिवाजी वेताळ, परशुराम कोतकर, राजाराम रोहकले, रुपचंद ढवळे, विराज शिंदे यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# कॅलिडोस्कोप



## मिळाले उभे राहण्याचे बळ

लाखो रुपयांचे पॅकेज असणारे अनेक कर्मचारी आपला जॉब सोडून वेगळे काही तरी करण्याचा प्रयत्न करताना मोठ्या प्रमाणात दिसत आहेत. नोकरीपेक्षा वेगळा मार्ग निवडून अनेक कर्मचारी आज लाखो रुपयांची कमाई करताना दिसत आहेत. अशीच एक गोष्ट सध्या समोर आली. अमेरिकेतील लाखोंचे पॅकेज, 'विप्रो'सारख्या दिग्गज कंपनीत तब्बल १२ वर्षे करिअर करून त्यांनी चक्क शेती आणि शेतकऱ्यांच्या जीवनाशी जोडले जाण्याचा घेतला; मात्र बेंगळुरू विद्यापीठातून बी. टेकचे शिक्षण घेतलेल्या शशि कुमार यांनी हा धाडसी निर्णय घेत कॉर्पोरेट क्षेत्रातील नोकरीला रामराम ठोकून भारतात परत येत 'अक्षय कल्प' या ऑर्गेनिक डेअरी आणि ॲग्रीटेक व्यवसायाची सुरुवात केली.

शशि कुमार यांचे वडील स्वतः शेतकरी होते. त्यामुळे शेतीतील कष्ट, अडचणी आणि शेतकऱ्यांची परिस्थिती त्यांनी जवळून पाहिली होती. शेतकऱ्यांच्या अडचणींनी व्यथित झालेल्या शशि यांनी त्यांचे जीवनमान बदलण्याचा निर्धार केला; मात्र मुलाने स्थिर नोकरी सोडून शेतीशी संबंधित व्यवसायात उतरण्याचा निर्णय घेतल्याने त्यांच्या वडिलांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. इतकेच नाही, तर वडिलांनी तब्बल आठ वर्षे मुलाशी संवादही साधला नाही. नोकरी सोडणे ही केवळ सुरुवात होती. 'अक्षय कल्प' उभारताना शशि कुमार यांना प्रचंड आर्थिक संकटांचा सामना करावा लागला. सुरुवातीच्या नऊ वर्षांत तब्बल सहा वेळा कंपनी बंद पडण्याची आणि दिवाळखोरीची परिस्थिती निर्माण झाली. एकूण जवळपास दहा वेळा ते पूर्णपणे कोलमडण्याच्या उंबरठ्यावर पोहोचले; मात्र त्यांनी हार मानली नाही.

या कठीण काळात त्यांच्या पत्नीने मोठा आधार दिला. व्यवसाय वाचवण्यासाठी त्यांनी स्वतःची आयुष्यभराची बचत असलेले तीस लाख रुपये शशि कुमार यांच्या स्वाधीन केले. पत्नीच्या या विश्वासामुळे त्यांना पुन्हा उभे राहण्याचे बळ मिळाले. त्यानंतर त्यांनी रात्रंदिवस मेहनत घेत व्यवसायाला नव्या उंचीवर नेले. आज त्याच 'अक्षय कल्प'चा वार्षिक व्यवसाय तब्बल सातशे कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्याचा दावा केला जात आहे. कंपनी दरमहा सुमारे साठ कोटी रुपयांचा नफा कमावत असल्याचेही या माहितीत नमूद करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, या उपक्रमाशी आज दोन हजार आठशेहून अधिक शेतकरी थेट जोडले गेले आहेत. कंपनीकडून प्रत्येक शेतकऱ्याला सरासरी दरमहिना एक लाख २८ हजार रुपये दिले जात असल्याचे सांगितले जाते.

म्हणजेच वर्षभरात शेतकऱ्यांना सुमारे ४८० कोटी रुपये मिळत असल्याचा दावा आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना चांगला बाजारभाव आणि स्थिर उत्पन्न मिळवून देण्याच्या मॉडेलमुळे 'अक्षय कल्प'ची चर्चा होत आहे.



## गुमनाम है कोई

इजिप्तमध्ये असंख्य ममी आहेत. हजारो वर्षांपासूनच्या या ममी पिरॅमिडमध्ये जपून ठेवण्यात आल्या आहेत. या ममीज म्हणजे जगातलं एक आश्चर्यच म्हणता येईल. ममीवर आधारित बरेच चित्रपट आले. या चित्रपटांमधून बरंच काही भयावह दाखवण्यात आलं. ब्रिटनमध्येही असंच काही तरी घडलं. इथे एका पेटीत ममी ठेवली होती. या पेटीतून चित्रविचित्र आवाज यायला सुरूवात झाली. मग शास्त्रज्ञांनी हा आवाज ध्वनिमुद्रित करायचा निर्णय घेतला. रेकॉर्ड झालेला हा आवाज ऐकून शास्त्रज्ञांनाही धक्काच बसला. ब्रिटनमधल्या लीड्स सीटी म्युझियममध्ये एक ममी ठेवण्यात आली आहे. निसियामून असं या ममीचं नाव आहे. ही ममी तीन हजार वर्षांपूर्वीची असल्याचं म्हटलं जातं. इजिप्तचा राजा फॅरो रामसेस ११ च्या दरबारात काम करणाऱ्या एका पुजाऱ्याची ही ममी असल्याचं बोललं जातं. हा पुजारी राजासाठी खबरी म्हणून काम करायचा. तसंच तो त्याला धार्मिक गाणीही ऐकवायचा. या ममीच्या वरून हवा गेल्यानंतर तिच्या तोंडातून विचित्र आवाज येत असे. हे बघून शास्त्रज्ञांची उत्सुकता चाळवली. त्यांनी हा आवाज रेकॉर्ड करायचं ठरवलं. मग त्यांनी ममीच्या गळ्याचं सीटी स्कॅन केलं. मग थ्रीडी प्रटर तंत्रज्ञानाने ममीचं स्वरयंत्र तयार केलं. मग ममीच्या गळ्यातून आवाज काढण्यात आला. त्यावेळी ममीच्या गळ्यातून कण्हण्याचा आवाज आला. ममीवरून हवा गेल्यानंतर येणाऱ्या आवाजाशी हा आवाज तंतोतंत जुळला. ममीच्या जीभेचा काही भाग गायब असल्याचं सीटी स्कॅन दरम्यान लक्षात आलं. गेल्या तीन हजार वर्षांमध्ये ममीची जीभ सडून गेल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. सध्या या आवाजाचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे.



## शॉपिंग करायला... स्वस्त खरेदीचा लुटा आनंद!

शॉपिंग करायला सर्वांना आवडते; पण मोठे दुकान आणि मॉलमधून खरेदी करणे सर्वांच्या खिशाला पडवडणारे नव्हते. त्यामुळे आपण स्वस्त मार्केटच्या शोधात असतो. जर तुम्हालादेखील कमी स्वस्त आणि मस्त शॉपिंग करायची असेल, तर देशात असे पाच मार्केट आहेत, जिथे लागणाऱ्या वस्तू कमी दरात मिळतात. या मार्केटमध्ये कपडेदेखील कमी दरात मिळतात.

**मंगलदास मार्केट मुंबई**

मुंबईतील मंगलदास मार्केट शंभर वर्ष जुने आहे. हे टेक्सटाईल मार्केट आहे. येथे सिल्क, कॉटन, ब्रोकेट, शिफॉन, नेट आणि सिंथेटिक फॅब्रिक सहज मिळतात. मुंबईतील अनेक लोक येथेच शॉपिंग करतात. येथे कपड्यांची सुरुवात शंभर रुपयांपासून होते.

**बडा बाजार, कोलकाता**

'बडा बाजार'ची सुरुवात अठराव्या शतकात 'ईस्ट इंडिया' कंपनीच्या राजवटीत झाली. येथे कपडे, कृत्रिम दागिने आणि सौंदर्यप्रसाधने यासारख्या वस्तू सहज उपलब्ध होतात. या बाजाराची माहिती असलेल्यांच्या मते, येथील कपडे किरकोळ दुकाने किंवा मॉल्सच्या तुलनेत ४० ते सत्तर टक्के स्वस्त असतात. 'बडा बाजार'मध्ये ट्रेंडी कुर्तीची किंमत ५५ ते दीडशे रुपयांपासून सुरू होते, तर चांगल्या दर्जाच्या साड्या अवघ्या दोनशे रुपयांमध्ये मध्ये मिळू शकतात.

**रिंग रोड मार्केट, सुरत**

'रिंग रोड' येथे असलेले मार्केट कोणत्याही एका विशिष्ट नावाने ओळखले जात नाही. त्याऐवजी, ते अनेक मोठ्या व्यावसायिक संकुलांनी बनलेले आहे जिथे हजारो दुकाने आहेत. हे मार्केट प्रामुख्याने साड्या आणि पारंपरिक कपड्यासाठी प्रसिद्ध आहे. येथे तुम्हाला अवघ्या शंभर रुपयांपासून उत्कृष्ट दर्जाच्या साड्या मिळू शकतात, तर लग्नासाठीचे लेहेंगे एक हजार रुपयांपासून उपलब्ध आहेत.

**गांधी नगर मार्केट, दिल्ली**

ही बाजारपेठ रेडिमेड कपडे आणि टेक्सटाइलसाठी आशियातील सर्वात मोठी होलसेल मार्केट म्हणून ओळखला जातो. येथे हजारो दुकाने आणि कपड्यांचे कारखाने आहेत. या मार्केटची स्थापना १९७१ मध्ये झाली होती. विविध शहरांमधील व्यापारी प्रामुख्याने येथूनच आपला माल खरेदी करतात. किरकोळ विक्रीच्या बाबतीतही, येथे साधारणपणे शंभर रुपयांना चांगल्या दर्जाचे कपडे मिळू शकतात.

सरोजिनी मार्केट, दिल्ली

स्वस्त आणि मस्त कपड्यांसाठी दिल्ली येथील सरोजिनी मार्केट प्रसिद्ध आहे. येथे तुम्हाला शंभर रुपयांमध्ये तीन-चार टीशर्ट मिळतात. शिवाय पन्नास रुपयांमध्ये जिन्स मिळते. कपड्यांशिवाय या मार्केटमध्ये घड्याळ, चष्मा, परफ्यूम, बूट अशा अनेक वस्तू कमी दरात मिळतात. दिल्लीत राहणारी प्रत्येक व्यक्ती या मार्केटमध्ये शॉपिंगसाठी येथे येत असते.

## 'एआय'च्या मदतीने केले स्टडी ॲप!



आजच्या काळात कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे फक्त मोठ्या कंपन्यांसाठीचे तंत्रज्ञान राहिलेले नाही. ही बाब चीनमधल्या एका १३ वर्षांच्या मुलीने सिद्ध करून दाखवले आहे. शांघायमध्ये शिकणाऱ्या झू शुहान या मुलीने कोणताही प्रोग्रामिंगचा अनुभव नसताना 'एआय'च्या मदतीने एक 'स्टडी ॲप' तयार केले. त्यातून अवघ्या तीन दिवसांत तिने तब्बल १८ हजार युआन म्हणजेच सुमारे अडीच लाख रुपये कमवले. तिची ही कहाणी सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. झू शुहान ही ज्युनियर सेकंडरी स्कूलमध्ये शिकते. विशेष म्हणजे तिला कोडिंग किंवा प्रोग्रामिंगचे विशेष ज्ञान नव्हते. तिने अवघ्या वर्षभरापूर्वी 'एआय' वापरण्यास सुरुवात केली होती; मात्र एका दैनंदिन समस्येवर उपाय शोधण्याच्या प्रयत्नातून तिने स्वतःचे 'एआय' प्रोडक्ट तयार केले.

शुहानने तयार केलेल्या 'झाई चँग' म्हणजेच 'ऑन साईट' या ॲपचा उद्देश मुलांच्या अभ्यासावर लक्ष ठेवण्यासाठी पालकांना मदत करणे हा आहे. पालक ॲपमध्ये स्वतःचा फोटो अपलोड करतात. त्यानंतर 'एआय'च्या मदतीने त्या फोटोवर आधारित एक व्हर्च्युअल पॅरेंट तयार केला जातो. मुले अभ्यास करत असताना कॅमेरा त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवतो. मूल मोबाईल वापरू लागले किंवा अभ्यासाची जागा सोडून उठले, तर स्क्रीनवर दिसणारा व्हर्च्युअल पालक आवाजाच्या माध्यमातून त्याला पुन्हा अभ्यासाकडे लक्ष देण्याची आठवण करून देतो. अभ्यास पूर्ण झाल्यानंतर ॲप 'कॉन्संट्रेशन रिपोर्ट' देखील तयार करते. या ॲपची कल्पना शुहानला तिच्या स्वतःच्या अनुभवातून सुचली. तिचे आई-वडील व्यस्त असल्यामुळे ते नेहमी तिच्यासोबत बसून अभ्यास करवून घेऊ शकत नव्हते. त्यामुळे अभ्यास करताना तिचे लक्ष विचलित व्हायचे आणि ती कधी कधी लपून मोबाईल वापरायची. तिच्या मित्रांनाही अशीच समस्या असल्याचे तिला जाणवले. त्यामुळे तिने 'डिजिटल पॅरेंट क्लोन' तयार करण्याचा विचार केला. सर्वात आश्चर्याची गोष्ट म्हणजे शुहानने तिची कल्पना 'एलएलएम' म्हणजेच मोठ्या भाषिक मॉडेलला साध्या भाषेत समजावून सांगितली.



## बबलमध्ये बसा, वन्यप्राणी पाहा

प्राण्यांना जंगलात मुक्तपणे विहार करताना बघणं कोणाला आवडणार नाही... जंगल सफारीदरम्यान विविध प्राणी न्याहाळता येतात. हे प्राणी आपल्या घरात अगदी निवांत फिरत असतात. हा अनुभव खूप अनोखा असतो. हे प्राणी बघण्यासाठी जीप कवा बसमधून फिरावं लागतं. पण थायलंडमध्ये येणाऱ्या पर्यटकांना पारदर्शी बबलमध्ये बसून वन्य प्राणी न्याहाळता येणार आहेत. इथल्या अनंतरा गोल्डन ट्रँगल एलिफंट कॅम्प अँड रिसॉर्टमध्ये पारदर्शी बबल्स तयार करण्यात आले आहेत. या तंबूरुपी बबल्समध्ये बसून आजूबाजूचे हत्ती बघता येतील. हा जगातला पहिलाच प्रयत्न असल्याचा रिसॉर्टचा दावा आहे. या बबल्समध्ये मोठ्या आकाराचा बेड आणि लिव्हिंग रुम आहे. अर्थात हा जगावेगळा अनुभव घेण्यासाठी एका रात्रीचे ३५ हजार रुपये मोजून दोनजण बबलमध्ये राहू शकतील. हे बबल्स वातानुकुलीत आहेत. अशा बबल्समध्ये बसून वन्य प्राणी बघण्याचा अनुभव भन्नाट असेल यात काहीच शंका नाही.

## या देशांकडे नाही लिखित संविधान

भारतात लोकशाही आहे. या देशाच्या नागरिकांना संविधानाने विविध स्वातंत्र्यं बहाल केली आहे. भारताचं संविधान लिखित स्वरुपात आहे. आपल्या देशाचा गाडा संविधानानुसारच हाकला जातो. पण काही देशांमध्ये लिखित संविधान नाही. मग या देशांचा गाडा कशा प्रकारे हाकला जात असावा? जाणून घेऊ.

ब्रिटिशांनी भारतावर राज्य केलं. पण या ब्रिटनकडे स्वतःचं संविधान नाही. वाचून आश्चर्य वाटलं असेल. पण हे खरं आहे. या देशात काही नियम तयार करण्यात आले होते. या नियमांना आधारभूत मानून इथे शासन चालवलं जातं. या नियमांना संविधानाइतकंच महत्त्व आहे. ब्रिटनमधले कायदे वेळ आणि परिस्थितीनुसार बदलता येतात. इथल्या संसदेकडे हे अधिकार आहेत.

सौदी अरेबियामध्येही चित्रविचित्र प्रथा आहेत. इथल्या नियम, कायद्यांविषयी आपण जाणतोच. या देशालाही संविधान नाही. इथला राज्यकारभार कुराणातल्या वचनांनुसार चालतो.



इस्रायलकडेही स्वतःचं संविधान नाही. स्वातंत्र्यानंतर इस्रायलमध्ये संविधान तयार करण्याच्या घडामोडींना वेग आला होता. पण संसदेत होणाऱ्या गदारोळामुळे हे शक्य झालं नाही. इथे अलिखित संविधानाला मान्यता देण्यात आली आहे.

न्यूझीलंडमध्येही लिखित संविधान नाही. इथे अलिखित संविधान आहे. त्यानुसार इथलं शासन चालतं.

## मद्यपानाला इथे आहे परवानगी

आपल्या देशात बजेटला खूप महत्त्व आहे. बजेट सादर करणारा मंत्री हुशार असावा, त्याला अर्थशास्त्राचं ज्ञान असावं अशी आपली अपेक्षा असते. बजेटमुळे काय स्वस्त होणार, काय महागणार, कोणाला काय मिळालं यावर बरीच चर्चा होत असते. निर्मला सीतारामन या भारताच्या अर्थमंत्री आहेत. विविध देशांमध्ये बजेट सादर होतं. पण ब्रिटनमधलं बजेट खऱ्या अर्थाने अनोखं म्हणता येईल. इथे बजेट सादर करणाऱ्या मंत्र्याला चान्सलर म्हटलं जातं. कोणत्याही देशाची संसद म्हणजे लोकशाहीचं पवित्र मंदिर. अशा मंदिरात मद्यपान करून येणं चुकीचं आहे. पण ब्रिटनमध्ये चान्सलर मद्यपान करून बजेट सादर करू शकतो. त्याला तशी परवानगी असते. ब्रिटनची संसद म्हणजे हाऊस ऑफ कॉमन्सच्या नियमावलीत या बाबीचा समावेश आहे. मद्यपान करून बजेट सादर करण्याचा अधिकार फक्त चान्सलरला असतो. वर्षातला फक्त एकच दिवस चान्सलर मद्यपान करून संसदेत येऊ शकतो. त्यानंतर त्याला अशी परवानगी नसते. हा नियम ब्रिटनमध्ये अनेक दशकांपासून आहे. इथल्या लोकांना हा प्रकार अर्थहीन वाटतो. इतकंच नाही, तर इथे बजेट सादर करण्यासाठी १०० वर्षं एकाच ब्रीफकेसचा वापर करण्यात आला होता. १८६० मध्ये विलियम ग्लॅडस्टोन यांच्यासाठी ही ब्रीफकेस तयार करण्यात आली होती. स्कारलेट असं या ब्रीफकेसचं नाव होतं. १९६५ पर्यंत याच ब्रीफकेसमध्ये बजेट असायचं. १९६५ मध्ये तत्कालीन चँसेलर जेम्स कॅलेघन यांनी स्वतःसाठी नवी ब्रीफकेस तयार करून घेतली आणि स्कारलेटला बाद केलं.



## खाकी वर्दीतील संवेदनशील माणूस!

अनेकदा गोरगरिबांचे, सर्वसामान्यांचे न ऐकणारा, जराशी चूक दिसली की पैसे उकळणारा अशीच प्रतिमा पोलिसांची बनली आहे; मात्र 'सदरक्षणाय खलनिग्रहनाय' या ब्रीदला घेऊन काम करणाऱ्या खाकी वर्दीतल्या पोलिसांची, अधिकाऱ्यांचीही कमी नाही. पोलिसांमध्ये दडलेला हा खमक्या अधिकारी आणि संवेदनशील माणूसही कित्येकदा पाहायला मिळतो. बेळगावचे पोलिस आयुक्त भूषण गुलाबराव बोरसे यांच्या संवेदनशीलपणा बेळगावच्या वीर राणी कित्तूर चन्नम्मा चौकात पाहायला मिळाला.

कडक शिस्तीचा, कायद्याचे पालन करणारा, प्रसंगी लाठी उगारणारा असेच चित्र डोळ्यासमोर उभे राहते; पण या खाकी वर्दीच्या आतमध्ये एक संवेदनशील माणूसदेखील असतो याचे दर्शन बेळगावच्या पोलिस आयुक्तांच्या कृतीतून घडले. भाजपच्या आंदोलनासाठी कार्यकर्ते मोठ्या संख्येने चौकात जमले होते. एकीकडे घोषणाबाजी सुरू होती. रस्त्यावर धरणे सुरू होते. आंदोलन सुरू असतानाच अचानक जोरदार पाऊस सुरु झाला. आंदोलन सुरू असताना पावसाचा जोर वाढला आणि आंदोलनात सहभागी होण्यासाठी आलेल्या काही वृद्धांना पावसापासून बचाव करण्यासाठी आसरा शोधावा लागला. त्या वेळी बंदोबस्ताचे निरीक्षण करत असलेले बेळगावचे पोलिस आयुक्त भूषण गुलाबराव बोरसे यांनी वृद्ध आंदोलकांना पावसात भिजत असलेले पाहिले. त्यानंतर पुढे येत त्यांनी या वृद्ध आंदोलकांना आपल्या छत्रीत घेतले. पोलिस आयुक्तांची ही एकदम साधी वाटणारी कृती; पण उपस्थितांचे लक्ष वेधून घेणारे ठरली. घडला प्रसंग साधा पण पोलिस अधिकाऱ्याच्या संवेदनशीलपणाचे दर्शन घडवणारा ठरला.



बोरसे हे २००९ च्या यूपीएससी (आयपीएस) बॅचचे अधिकारी आहेत, ते कर्नाटक कॅडरचे अधिकारी आहेत. यापूर्वीही त्यांनी विविध ठिकाणी पोलिस दलातील महत्त्वाच्या पदांवर कार्यभार सांभाळला आहे. बोरसे हे महाराष्ट्रातील धुळे जिल्ह्याचे रहिवासी असून त्यांनी पुणे विद्यापीठातून केमिकल इंजिनिअरिंग आणि एनआयटी, जमशेदपूर येथून एम. टेक. पदवी प्राप्त केली आहे.

## पोटात बाळच नाही!

पाकिस्तानच्या कराचीमध्ये गर्भधारणेशी संबंधित एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एका महिलेला ३८ आठवड्यांची गर्भवती असल्याचे सांगून रुग्णालयात आणण्यात आले. तिच्याकडे गर्भधारणेची पुष्टी करणारा 'अल्ट्रासाऊंड रिपोर्ट'ही होता. डिलिव्हरीची वेळ जवळ आल्याने डॉक्टरांनी तपासणीनंतर ऑपरेशन करण्याचा निर्णय घेतला; मात्र शस्त्रक्रियेदरम्यान महिलेच्या पोटात गर्भच नसल्याचे समोर आले. यानंतर कुटुंबीयांनी रुग्णालयावर बाळ गायब केल्याचा गंभीर आरोप केला; मात्र पोलिसांच्या प्राथमिक तपासात वेगळेच चित्र समोर आले.

ही महिला २७ ऑगस्ट रोजी कराचीतील एका रुग्णालयात दाखल झाली. कुटुंबीयांना ती जवळपास नऊ महिन्यांची गर्भवती असल्याचे वाटत होते. महिलेने डॉक्टरांना दाखवलेल्या 'अल्ट्रासाऊंड रिपोर्ट'मध्ये '३८८ आठवड्यांची गर्भधारणा' असल्याचे नमूद होते. त्यामुळे कुटुंब डिलिव्हरीची अपेक्षा ठेवून रुग्णालयात पोहोचले होते. रुग्णालयातील ड्युटीवरील डॉक्टरांनी महिलेची वैद्यकीय तपासणी केली. त्यासोबत आवश्यक चाचण्याही करण्यात आल्या. महिलेने दाखवलेल्या 'अल्ट्रासाऊंड रिपोर्ट'मध्ये गर्भधारणा ३८ आठवड्यांची असल्याचे नमूद असल्याने डिलिव्हरीसाठी ऑपरेशन करण्याचा निर्णय घेण्यात आला; मात्र शस्त्रक्रिया सुरू केल्यानंतर डॉक्टरांना गर्भाशयात बाळच नसल्याचे आढळले. त्यामुळे रुग्णालयात एकच खळबळ उडाली.



परिस्थिती गंभीर झाल्यानंतर पोलिसांना घटनास्थळी बोलावण्यात आले. पोलिसांनी प्राथमिक चौकशी केल्यानंतर या प्रकरणाला वेगळे वळण मिळाले. प्राथमिक तपासानुसार रुग्णालयातून कोणतेही बाळ गायब झालेले नव्हते. महिलेनेच आपल्या कुटुंबीयांपासून गर्भधारणेची माहिती लपवण्यासाठी खोटे चित्र निर्माण केल्याचा संशय तपासात समोर आला. त्यामुळे सुरुवातीला रुग्णालयावर झालेला संशयाचा आरोप वेगळ्या दिशेने गेला. पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, महिलेचे लग्न होऊन सुमारे तीन वर्षे झाली आहेत. कुटुंबाकडून मूल होण्यासाठी तिच्यावर दबाव असल्याचे समोर आले आहे. या दबावातून तिने स्वतः गर्भवती असल्याचे सांगितल्याचा आणि त्यासाठी बनावट 'अल्ट्रासाऊंड रिपोर्ट' तयार करून घेतल्याचा आरोप आहे; मात्र या प्रकरणातील तपासाच्या अंतिम निष्कर्षासाठी अधिकृत तपशील आणि पुढील कायदेशीर प्रक्रिया महत्त्वाची ठरणार आहे. या घटनेमुळे रुग्णालयातील वैद्यकीय प्रक्रियेवरही प्रश्न उपस्थित झाला आहे. या प्रकरणातून शस्त्रक्रियेपूर्वी उपलब्ध वैद्यकीय कागदपत्रांची स्वतंत्र पडताळणी किती महत्त्वाची आहे, हा प्रश्नही पुढे आला आहे.

# दुष्काळग्रस्त भागातील पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याचा सुरळीत पुरवठा

### अहिल्यानगर जिल्ह्यात २७ लाखांहून अधिक लाभार्थ्यांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा लाभ; ऑक्टोबर-नोव्हेंबरसाठी २ लाख ८५ हजार ३७८ क्विंटल अन्नधान्याच्या उचलीस मंजुरी

नगर – राज्यात जून ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत झालेली पर्जन्यमानातील तूट आणि त्यातून निर्माण झालेली दुष्काळसदृश परिस्थिती लक्षात घेऊन दुष्काळग्रस्त तालुक्यांतील पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ वेळेत आणि विनाविलंब मिळावा, यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे अन्नधान्य उपलब्ध करून देणे, अन्नधान्य वितरणात पारदर्शकता राखणे आणि दुष्काळाच्या काळात नागरिकांना दिलासा देणे, यासाठी पुरवठा यंत्रणा कार्यरत असल्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीमती हेमा बडे यांनी सांगितले.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर अन्नधान्याची उपलब्धता, साठवणूक, उचल आणि रास्तभाव दुकानांमार्फत वितरण या सर्व बाबींचे नियोजन करण्यात येत असून, जिल्ह्यातील एकही पात्र लाभार्थी अन्नधान्यापासून वंचित राहू नये, याची दक्षता घेण्यात येत आहे.

#### जिल्ह्यातील २७ लाखांहून अधिक लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ

अहिल्यानगर जिल्ह्यात एकूण १० लाख ६० हजार ८७२ अंत्योदय, केशरी व शुभ्र शिधापत्रिका आहेत. या शिधापत्रिकांशी संबंधित अंत्योदय व प्राधान्य कुटुंबांतील एकूण ६ लाख ८४ हजार ६५६ शिधापत्रिका धारकांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत अन्नधान्याचा लाभ दिला जातो. शासनाच्या नियमानुसार पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्य उपलब्ध करून देण्यास प्राधान्य देण्यात येत आहे.

दुष्काळामुळे ग्रामीण भागातील नागरिकांसमोर विविध आव्हाने निर्माण होत असताना, सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या माध्यमातून पात्र कुटुंबांना अन्नधान्याचा लाभ नियमितपणे मिळणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे वितरण प्रक्रियेत कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, तसेच लाभार्थ्यांना अनावश्यक अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी संबंधित यंत्रणेला दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

#### दोन महिन्यांसाठी २ लाख ८५ हजार ३७८ क्विंटल अन्नधान्याच्या उचलीस मंजुरी

जिल्ह्यातील तालुकानिहाय शासकीय गोदामांची एकूण साठवण क्षमता ३६ हजार ६० मेट्रिक टन आहे. ऑक्टोबर व नोव्हेंबर २०२६ या दोन महिन्यांसाठी आवश्यक असलेल्या २ लाख ७९ हजार २३७ क्विंटल अन्नधान्याच्या उचलीस मंजुरी देण्यात आली आहे. त्यापैकी १ लाख ५१ हजार ७०९ क्विंटल अन्नधान्याची उचल पूर्ण झाली आहे.

उर्वरित अन्नधान्याची उचल निर्धारित वेळेत पूर्ण करून त्याचे रास्तभाव दुकानांमार्फत पात्र लाभार्थ्यांना नियोजनबद्ध वितरण करण्यावर भर देण्यात येत आहे. यासाठी उपलब्ध साठा, मंजूर नियतन आणि प्रत्यक्ष वितरण यांचा नियमित आढावा घेण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेला देण्यात आल्या आहेत.

#### अन्नधान्य उपलब्धतेची स्थिती एका दृष्टिक्षेपात

१०,६०,८७२ – जिल्ह्यातील एकूण अंत्योदय, केशरी व शुभ्र शिधापत्रिका
६,८४,६५६ –अंत्योदय व प्राधान्य शिधापत्रिका धारक
३६,०६० मे.टन – शासकीय गोदामांची एकूण साठवण क्षमता
२,८५,३७८ क्विंटल– ऑक्टोबर–नोव्हेंबरसाठी मंजूर अन्नधान्याची उचल
१,५९,७०९क्विंटल– आतापर्यंत पूर्ण झालेली अन्नधान्याची उचल

#### पात्र लाभार्थ्यांपर्यंत योजनांची माहिती पोहोचविण्यावर भर

दुष्काळ निवारणासाठी शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या उपाययोजना, अन्नधान्य वितरणाची स्थिती आणि सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत उपलब्ध सुविधांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे काम संबंधित पुरवठा निरीक्षण अधिकारी व पुरवठा निरीक्षक यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

८ ऑक्टोबर रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्यात येत असून, पात्र लाभार्थ्यांना शासनाच्या नियमांनुसार लाभ मिळावा यासाठी संबंधित विभागांमध्ये समन्वय राखण्यात येत आहे. अन्नधान्य वितरणात अडचणी निर्माण झाल्यास त्या तातडीने संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देऊन आवश्यक कार्यवाही करण्यावर भर आहे.

#### नवीन लाभार्थ्यांची निवड शासनाच्या निकषांनुसार

सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा लाभ अधिकाधिक पात्र नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी नवीन लाभार्थ्यांची निवड शासनाने निर्धारित केलेल्या निकषांनुसार केली जाते. प्राप्त माहितीनुसार, नवीन लाभार्थ्यांच्या निवडीसाठी शहरी भागात वार्षिक उत्पन्नाची मर्यादा ५९ हजार रुपये, तर ग्रामीण भागात ४४ हजार रुपये विचारात घेतले जातात. लाभार्थ्यांची पात्रता निश्चित करताना संबंधित शासन निर्णय, लागू नियम आणि आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून पुढील कार्यवाही केली जाते. त्यामुळे पात्र नागरिकांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा लाभ मिळविण्यासाठी संबंधित नियमांनुसार अर्ज व कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

#### 'वन नेशन, वन रेशन कार्ड'मुळे स्थलांतरित लाभार्थ्यांनाही सुविधा

केंद्र शासनाच्या 'वन नेशन, वन रेशन कार्ड' योजनेअंतर्गत पात्र शिधापत्रिकाधारकांना पोर्टेबिलिटीची सुविधा उपलब्ध आहे. रोजगार, व्यवसाय किंवा अन्य कारणांमुळे एखादा लाभार्थी दुसऱ्या तालुक्यात, जिल्ह्यात अथवा राज्यात स्थलांतरित झाला, तरी योजनेच्या लागू नियमांनुसार आणि उपलब्ध पात्रतेनुसार संलग्न रास्तभाव दुकानातून अन्नधान्याचा लाभ घेता येतो.

या सुविधेमुळे स्थलांतरित कामगार आणि इतर पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्य मिळविण्यासाठी केवळ मूळ गावातील रास्तभाव दुकानावर अवलंबून राहावे लागत नाही. त्यामुळे स्थलांतरित ठिकाणीही सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा लाभ घेणे सुलभ होते.

#### अन्नधान्य वितरणाबाबत तक्रारी असल्यास संपर्क साधण्याचे आवाहन

पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्य मिळण्यात अडचण येत असल्यास किंवा वितरणाबाबत तक्रार असल्यास त्यांनी संबंधित रास्तभाव दुकानदार, तहसील कार्यालयातील पुरवठा विभाग किंवा जिल्हा पुरवठा कार्यालयाशी संपर्क साधावा. तक्रारींची दखल घेऊन नियमानुसार आवश्यक कार्यवाही करण्याची व्यवस्था उपलब्ध आहे.

दुष्काळाच्या परिस्थितीत नागरिकांना अन्नधान्याचा नियमित लाभ मिळणे, उपलब्ध साठ्याचे योग्य नियोजन करणे आणि वितरण प्रक्रियेत पारदर्शकता राखणे याला प्राधान्य देण्यात येत आहे. पुरवठा यंत्रणेने समन्वयाने काम करून पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे अन्नधान्य वेळेत उपलब्ध करून द्यावे, यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे.



## गुरुवाणी – ८०

### चांगल्या कामास उशीर नको

सुधर्मा स्वामींच्या हृदयातील भगवान महावीर सर्वात वेगळे आहेत. सर्व स्थितीत तीर्थंकर सर्वश्रेष्ठ आहेत. त्यांची श्रद्धा, पुरूषार्थ, तप, उत्साह, शक्ती इतकी अलौकिक होती की ते मोक्ष गतीत जाऊ शकत होते. पण केवळ ४९ श्वासोच्छ्वासाचे अंतर होते. परिणामी तीर्थंकर परमात्मा इंद्रभूती गौतमला सांगतात, 'समय का प्रमाद नही करना'. इतर गोष्टीत परिमार्जन होऊ शकते. पण एकदा वेळ गेल्यावर ती परत येत नाही. इतर सगळे प्रमाद क्षम्य आहेत, पण वेळेचा प्रमाद अक्षम्य आहे. अर्हम् विज्ञा कार्यक्रमात एक विधी आहे. सकाळी जागे झालात की लगेच आळस झटकून टाका. जागे होऊनही आळसाने पडून राहिलात तर वेळेचा प्रमाद सुरु होतो. पडून राहिला तरी तुम्ही जागृत अवस्थेत राहिले पाहिजे. वेळ आपल्या हातात नाही, ती आपली प्रॉपर्टी नाही. मी अशा शाळेचा शिक्षक आहे, ज्या शाळेत विद्यार्थ्यांना अनुशासन बंधनकारक आहे. पाप कर्म करण्यात जे एक सेकंद उशीर करत नाही ते सातव्या नरकात जातात. देवलोकात श्वासोच्छ्वास दीर्घ होतो तर नरकात श्वासोच्छ्वास खूप जलद होतो. यासाठी अर्हम् बेबीसाठी आईला दीर्घ श्वासोच्छ्वास घेण्यास सांगितले जाते. कोणत्याही धर्मात एकच चर्चा चालते, वैकुंठ, स्वर्ग, मोक्षप्राप्तीची. खरं तर स्वर्ग म्हणजे मोक्ष नाही. मोक्ष प्राप्ती झालेला जीव परत येत नाही. तीर्थंकरांइतके ज्ञानी दुसरे कोणी नाही. केवल ज्ञान तर सगळ्यांचे सारखेच असते पण तीर्थंकर महावीरांचे ज्ञान परम ज्ञान आहे. त्याकाळातही अनेक केवल ज्ञानी होते. त्यांना चंडकौशिकही माहिती होता. ते सुद्धा चंडकौशिकला सुधारू शकत होते. पण कोणीच त्याच्याकडे गेले नाही. पण तीर्थंकरांकडे जेव्हा चंडकौशिकचे विष पचवण्याची शक्ती आली तेव्हा ते त्याच्याकडे गेले. सामान्य केवल ज्ञानी ज्ञानी असतात तर तीर्थंकरांचे केवल ज्ञान ऐश्वर्य संपन्न आहे. जगात अनेक श्रीमंत असतात, खूप पैसा असतो. पण त्यांचा पैसा फायदा असेल तरच निघतो. जो करूणाशील आहे, त्याचा पैसा योग्य वेळी दुसऱ्यांच्या मदतीसाठी निघतो.

तीर्थंकरांच्या ज्ञानाची श्रीमंती अशी आहे, ऐश्वर्यशाली. त्यांची श्रद्धा सर्वव्यापी आहे. एक सूत्र लक्षात ठेवा, सकाळी जाग येताच पूर्ण जागृत व्हा, एक क्षणही दवडू नका. 'चांगल्या कामासाठी उशीर नाही करायचा आणि वाईट कामासाठी अजिबात घाई करायची नाही'. जिनेश्वरी, निर्वाण कल्याणक आराधने व्यतिरिक्त आयुष्यात चांगले काम कोणतेही नाही. मग त्याचा ढोल वाजवायला उशीर कशाला करायचा? – **उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# खास नवरात्री उत्सवानिमित्त रिल्स व निबंध स्पर्धा

### 'देवीची पूजा फक्त मंदिरात नको, लेकीचा सन्मान प्रत्येक घरात हवा'

नगर – येथील रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगरच्या वतीने खास नवरात्र उत्सवानिमित्त रिल व निबंध स्पर्धेचे आयोजन केले आहे. बेटी बचाओ समितीच्या प्रमुख डॉ. सुधा कांकरिया यांच्या पुढाकाराने होणाऱ्या स्पर्धेचा विषय 'देवीची पूजा फक्त मंदिरात नको, लेकीचा सन्मान प्रत्येक घरात हवा.' स्पर्धकांनी सहभाग घ्यावा अशी माहिती रोटरी क्लबचे अध्यक्ष रो. सुहास क्षीरसागर यांनी दिली.

सदर निबंध स्पर्धेला वयाचे किंवा शब्दांचे बंधन नसुन मराठी किंवा हिंदी भाषेत ती सादर करता येईल. तसेच रिल्सच्या विषयही तोच असुन जास्तीत जास्त १ मिनीटाची रिल हिंदी किंवा मराठी भाषेत असावी, अशी माहिती रोटरीचे सचिव रो. संदिप ठोंबे यांनी दिली.

सदर निबंध स्पर्धा डॉ. सुधा कांकरिया, साई सूर्य नेत्रसेवा, माणिक चौक, अहिल्यानगर या पत्यावर प्रत्यक्षरूपाने /पोस्टाने तसेच रिल्स ९८५०८८७८३८ या नंबरवर २० ऑक्टोबर पुर्वी पोहचवावी असे संयोजक कळवतात.

नवरात्र उत्सव एक नारीशक्ती जयघोष करणारा उत्सव आहे. आदीशक्तीची पुजा तसेच अनेक व्रत–यज्ञ–जप–तप ने केली जाते. या निमित्ताने शक्तीचे जागरण व्हावे असा हेतु असतो. परंतू एकीकडे मंदिरात देवीची पुजा केली जाते व दुसरीकडे मात्र गर्भातच तिला मारून टाकले जाते. हा विरोधाभास थांबावा, प्रत्येक घरोघरी स्त्री जन्माचे स्वागत व्हावे, तिचा सन्मान व्हावा, समाजाची विस्कटलेली घडी परत नीट बसावी यासाठी समाजाचा सक्रीय सहभाग आवश्यक आहे व त्यासाठी सदर स्पर्धेचे आयोजन फक्त अहिल्यानगर मध्येच नाही तर महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यातुन घेण्यात येत आहे. यासाठी रोटरीचे प्रांतपाल रो. जयेशभाई पटेल व रो. पारूल भाभी पटेल यांचे सहकार्य लाभत आहे असे स्त्री जन्माचे स्वागत करा चळवळीच्या आद्यप्रवर्तक व सदर प्रोजेक्टच्या चेअरमन डॉ. सुधा कांकरिया यांनी सांगितले.

# राहुरीतील खून प्रकरणातील मुख्य आरोपीला जामीन मंजूर

राहुरी – येथील बहुचर्चित सुधाकर थोरात खून प्रकरणात मुख्य आरोपी ज्ञानदेव याला न्यायालयाकडून जामीन मंजूर करण्यात आला आहे. या प्रकरणात आरोपीच्या वतीने ॲड. आकाश राजेश कावरे यांनी न्यायालयात युक्तिवाद करून आरोपीची बाजू मांडली.

फिर्यादीनुसार मृत सुधाकर थोरात यांच्या खून प्रकरणात त्यांची पत्नी आणि आरोपी ज्ञानदेव यांच्यावर आरोप. फिर्यादीनुसार, मृताची पत्नी आणि ज्ञानदेव यांच्यात अनैतिक संबंध होते. या संबंधांमध्ये पती सुधाकर थोरात अडथळा ठरत असल्याने त्यांना संपविण्याचा कट रचण्यात आल्याचा आरोप.

फिर्यादीनुसार २२ जानेवारी २०२६ रोजी आरोपी ज्ञानदेव याने सुधाकर थोरात यांना दवाखान्यात घेऊन जाण्याच्या बहाण्याने साकूर मांडवे येथून राहुरीच्या दिशेने नेण्यात आले. त्यानंतर कणगर शिवारातील वन विभागाच्या हद्दीतील निर्जनस्थळी आरोपी ज्ञानदेव याने उपरण्याने गळा आवळून त्यांचा खून करण्यात आल्याचा आरोप आहे. आरोपीच्या वतीने ॲड. आकाश कावरे यांनी अहमदनगर येथिल जिल्हा व सत्र न्यायालयासमोर प्रभावीपणे कायदेशीर बाजू मांडली आणि महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले तसेच तपासातील बाबी आणि कायदेशीर मुद्दे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर. सदर प्रकारणामध्ये गुण दोषा वर चौकशी होऊन न्यायालयाने मुख्य आरोपी ज्ञानदेव याला जामिनावर मुक्त करण्याचे आदेश दिले.

आरोपीच्या वतीने ॲड. आकाश राजेश कावरे यांनी न्यायालयात प्रभावीपणे बाजू मांडली.



एमआयडीसी नवनागापूर येथील रेणुका माता मंदिरासमोरील रस्त्याच्या दुभाजकावर तब्बल १५० झाडांची लागवड करण्यात आली असून, या उपक्रमामुळे मंदिर परिसर हिरवाईने बहरला आहे.

# श्री रेणुका माता देवस्थानच्या मंदिरासमोरील दुभाजकावर १५० झाडांची लागवड

नगर – एमआयडीसी नवनागापूर येथील श्री रेणुका माता देवस्थान ट्रस्टतर्फे नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंदिरासमोरील रस्त्याच्या दुभाजकावर तब्बल १५० झाडांची लागवड करण्यात आली असून, या उपक्रमामुळे मंदिर परिसर हिरवाईने बहरला आहे. केवळ वृक्षारोपण करून न थांबता या झाडांच्या संगोपनाची आणि संवर्धनाची जबाबदारीही देवस्थान ट्रस्टने स्वीकारली आहे.

देवस्थानमध्ये दरवर्षी नवरात्रोत्सव भक्तिभावाने साजरा केला जातो. धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांसोबतच सामाजिक बांधिलकी जपणारे उपक्रम राबविण्यावरही देवस्थान ट्रस्टचा भर असतो. मंदिरासमोरील रस्त्याच्या मध्यभागी असलेल्या दुभाजकावर माती टाकून वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमातून पर्यावरण रक्षण, वृक्षसंवर्धनाचा संदेश देण्यात आला. शहरातील रस्त्यांच्या दुभाजकांवर झाडे लावल्यामुळे परिसराचे सौंदर्य वाढण्यास मदत होते. त्याचबरोबर झाडांच्या योग्य संगोपनातून पर्यावरणाचा समतोल राखण्यासही हातभार लागतो. या उद्देशाने देवस्थान ट्रस्टने मंदिरासमोरील दुभाजकावर १५० झाडांची लागवड केली.

या उपक्रमाला आमदार संग्राम जगताप यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी स्वतः झाडांना पाणी घालून वृक्षसंवर्धनाच्या कार्यात सहभाग नोंदविला.

यावेळी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष प्रभाकर भोर, उपाध्यक्ष साहेबराव भोर, सचिव दत्तात्रय विटेकर, खजिनदार एकनाथ वाघ, विश्वस्त राजू भोर, विष्णू भोर, किरण सप्रे, गणेश कातोरे, महेश सप्रे, सचिन कोतकर, नगरसेवक कुमारसिंह वाकळे, नवनाथ कातोरे, संपत बारस्कर यांच्यासह भाविक उपस्थित होते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील रखडलेले सुशोभीकरण पूर्ण करावे

### रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचा महापालिका प्रशासनाला आमरण उपोषणाचा इशारा



नगर – बोल्हेगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील रखडलेले सुशोभीकरणाचे काम तातडीने पूर्ण करावे, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) यांच्या वतीने अहिल्यानगर महानगरपालिकेचे उपमहापौर धनंजय जाधव यांच्याकडे करण्यात आली आहे. येत्या चार दिवसांत काम सुरू करून ते पूर्ण होईपर्यंत काम बंद करू नये, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

बोल्हेगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकाच्या सुशोभीकरणाचे काम गेल्या दोन वर्षांपासून रखडले असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या कामात अडथळे निर्माण होत असल्याने चौकाचे सुशोभीकरण अपूर्ण राहिले आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाने या प्रकरणात तातडीने लक्ष घालून काम पूर्ण करावे, अशी मागणी पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे.

महापालिका प्रशासनाने चार दिवसांत काम सुरू करून ते पूर्ण करण्यासाठी कार्यवाही करावी. अन्यथा महापालिका आयुक्तांच्या दालनासमोर आंबेडकरी महिला व पुरुष कार्यकर्त्यांच्यावतीने आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. या आंदोलनाची जबाबदारी महानगरपालिका प्रशासनावर राहील, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. यावेळी अण्णासाहेब गायकवाड, माया जाधव, सारिका गांगुर्डे, आरती बडेकर, जयश्री गायकवाड, अलका बोरुडे,बाळासाहेब गायकवाड आदींसह रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

या मागणीसंदर्भात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) यांच्या वतीने महापालिका प्रशासनाला निवेदन सादर करण्यात आले आहे. त्यामुळे आता प्रशासन या रखडलेल्या कामाबाबत कोणती भूमिका घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# जि. प. शिक्षिका मोहिनी थिटे प्रदीर्घ सेवेतून निवृत्त

### गुंजाळे ग्रामस्थ आणि सहकारी शिक्षकांनी दिला हृद्य निरोप



अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या राहुरी तालुक्यातील गुंजाळे जि. प. शाळेतील अध्यापिका श्रीमती मोहिनी ज्ञानेश्वर थिटे – सातपुते या आपल्या सेवेतून निवृत्ती निमित्त गुंजाळे ग्रामस्थ आणि शाळेतील सहकारी शिक्षकांच्या वतीने श्रीमती मोहिनी थिटे – सातपुते यांना सेवापूर्ती समारंभात हृद्य निरोप देण्यात आला.

नगर – अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या राहुरी तालुक्यातील गुंजाळे जि. प. शाळेतील अध्यापिका श्रीमती मोहिनी ज्ञानेश्वर थिटे – सातपुते या आपल्या प्रदीर्घ सेवेतून निवृत्त झाल्या. त्यानिमित्त गुंजाळे ग्रामस्थ आणि शाळेतील सहकारी शिक्षकांच्या वतीने श्रीमती मोहिनी थिटे – सातपुते यांना सेवापूर्ती समारंभात हृद्य निरोप देण्यात आला.

मोहिनी थिटे – सातपुते या गेली साडेतीन वर्षे गुंजाळे जिल्हा परिषद शाळेत कार्यरत होत्या. त्यापूर्वी त्यांनी घोडेगाव (नेवासा), गजानन वसाहत, बोल्हेगाव (नगर) आणि लेकुरवाळी आखाडा (नेवासा) येथील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थी घडविण्याचे कार्य केले. त्यांचे अनेक विद्यार्थी आज चांगल्या पदांवर कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांशी मिळून मिसळून शिकविण्याच्या पद्धतीमुळे त्या विद्यार्थ्यांमध्ये आवडत्या शिक्षिका म्हणून प्रिय राहिल्या. सेवापूर्तीनिमित गुंजाळे ग्रामस्थ, शाळा व्यवस्थापन समिती आणि गुंजाळे जि. प. शाळेतील सहकारी शिक्षकांच्या वतीने आयोजित समारंभात श्रीमती मोहिनी थिटे – सातपुते यांच्या कार्याचा गौरव करून त्यांना हृदय निरोप देण्यात आला. यावेळी सरपंच गंगूबाई नवले आणि शिक्षण क्षेत्रातील अभ्यासू व्यक्तिमत्व तबाजी नवले पाटील यांच्या हस्ते शिक्षिका मोहिनी थिटे – सातपुते आणि पत्रकार नंदकुमार सातपुते यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी संजय बोबडे, केंद्रप्रमुख बाबा गोसावी, केंद्रप्रमुख वाकचौरे उपस्थित होते.

श्रीमती थिटे यांनी मनोगतात गुंजाळे जिल्हा परिषद शाळेच्या प्रगतीसाठी गुंजाळे ग्रामस्थ आणि शाळा व्यवस्थापन समितीचे मोठे योगदान असल्याचे सांगताना शाळेचे मुख्याध्यापक आणि सहकारी शिक्षकांबद्दल त्यांनी ऋणनिर्देश व्यक्त केले.

कार्यक्रमास शाळेतील विद्यार्थी, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, शिक्षक, ग्रामस्थ उपस्थित होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन किरण रासकर यांनी केले. मुख्याध्यापिका शीतल शिंदे यांनी स्वागत व आभार मानले.

# बुऱ्हानगर येथे आदिशक्ती मोफत महाआरोग्य शिबिराचा शुभारंभ



नगर – रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रल व डिग्निटी यांच्या संयुक्त विद्यमाने बुऱ्हानगर देवी येथे १८ ऑक्टोबर पर्यंत सकाळी १० ते सायंकाळी ६ या कालावधीत मोफत महाआरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले आहे. याचे उद्घाटन डी वाय एस पी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. प्रमुख पाहुणे म्हणून नाना जाधव (प्रांत संघ चालक), संपादक हनुमंतराव पाटील, पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात, सीडीजी रो. शिरीष रायते, रो.डॉ. प्रकाश गरुड, रो. डॉ. प्रकाश कांकरीया, रो.डॉ. सुधा कांकरीया, रो.एड.अभिषेक भगत (अध्यक्ष, रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर डिग्निटी), रो. डॉ. वैशाली पाटील (सचिव), रो. अमर गुरप (अध्यक्ष, रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रल), रो. सुनील मुथा (सचिव), रो. डॉ. कुणाल कोल्हे (प्रोजेक्ट चेअरमन), रो. अभय राजे (प्रोजेक्ट समन्वयक), रो. राहुल जामगावकर (प्रोजेक्ट व्यवस्थापक), डॉ. रोहित कानडे (आयुष्यमान भारत कार्ड), डॉ. राजहंस मॅडम (प्राचार्य वाय सी डी सी डेंटल कॉलेज), अहिल्यानगर ब्लड बँक, डॉ. छाजेड (आनंदऋषीजी नेत्रालय) आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर डिग्निटीचे अध्यक्ष ॲड. अभिषेक भगत यांच्या प्रास्ताविक भाषणाने झाली.

शिबिरात मोफत दंत तपासणी, नेत्र तपासणी, कॅन्सर तपासणी, ब्लड, बीपी, शुगर तपासणी, आयुष्यमान भारत आरोग्य कार्ड तसेच रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. विशेष म्हणजे या शिबिरात रक्तदान करणाऱ्या भाविकांना तात्काळ देवीचे दर्शन देखील देण्यात येत आहे.

या प्रसंगी रोटरीचे रो.सौ.उज्ज्वला रोजे, रो.सौ. कविता भगत, रो. डॉ. प्रदीप चौभे, रो.आशुतोष लांडगे, रो.दादा करंजुले, रो.डॉ अजिता चौभे, रो. अंकुर बोरकर, रो. हर्षद मुळे, रो. श्वेता मुळे, रो. पुष्कर वैकर, रो. कश्मिरा जामगावकर, रो. डॉ.श्रीकृष्ण जोशी, रो.सौ. वैजयंती जोशी, रो.डॉ. किर्ती कोल्हे, रो. मनिष बोरा, रो. सुनील कटारिया, रो. हरीश नय्यर, रो.चेतन अमरापुरकर, रो. ईश्वर बोरा, रो. प्रसन्न खाजगीवाले, रो. विजय जुंद्रे, रो. प्रभाकर बोगा आदी पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रलचे अध्यक्ष रो. अमर गुरप यांनी केले. अधिक माहितीसाठी ९९२३३ ८७२७२ / ९८६०२४९००५ / ९९२३२८४२४२.

